MAHMAR/ 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक ३ / मार्च २०१२

## संपादकीय

## नियतिशरणता

आपण आनंदात का राहू शकत नाही, आपल्याला कोणते ताणतणाव आणि का सतावतात या आणि अशा प्रश्नांची ओझी घेऊन इकडे तिकडे पळणारी माणसे पाहिली की मर्ढेकरांची 'पिपात मेले ओल्या उंदीर' ही कविता हमखास आठवते. आजच्या या 'टेन्शनग्रस्त' माणसांचे चेहरे सर्वत्रच गर्दी करतात. आनंदाची व्याख्या काय आहे, काय असू शकते, मुळात व्याख्या असतेच का, हे आणि असे प्रश्न मनात गर्दी करतच दिवस उजाडतो.

ही अवस्था आपल्या सभोवतालचीच आहे असे नाही तर जगभरच माणसांचे अस्तित्व प्रश्नांच्या वाळवीने नासवून टाकले आहे. यंत्र युग व त्यापाठोपाठ आलेले माहितीचे युग यांनी लोकसंख्यांचे आकडे बदलले, समीकरणे बदलली. शहर नावाची वस्ती वाढली आणि माणसाला माणसाइतकीही किंमत राहिली नाही हे वास्तव उगवले.

कोणतीही क्ष व्यक्ती घ्या, तिचे अस्तित्व हे हजारो प्रश्नांचा गुंता बनले आहे. ज्याच्याकडे आहे तो 'आहे' म्हणून रडतो तर नाही तो 'नाही' म्हणून रडतो. उगवत्या सूर्यांची तरुण पिढीही यातून सुटत नाही. नियतीला शरण जाणारी माणसे हे वास्तव ठरते. माणसं वाढली, शहरे वाढली तशी देवांची, प्रार्थनास्थळांची सुद्धा अमर्याद वाढ झाली. अलीकडेच पुरस्कार प्राप्त ठरलेला 'देऊळ' हा मराठी चित्रपट काय किंवा 'द गाईड' ही आर. के. नारायण यांची कादंबरी काय अशा प्रभावी कलाकृती, पुस्तकेही हे वास्तव अधोरेखित करतात. प्रत्येकाचीच दु:खे, प्रत्येकाचेच तणाव आणि प्रत्येकाचेच नशीब किंवा नियती! यामुळे नवसाला पावणारे देव वाटेल तसे वाढले, त्यांच्या समोरच्या रांगा वाढल्या आणि 'देवाच्या' अस्तित्वावर आपली पोळी भाजून घेणारेही प्रचंड प्रमाणात वाढले.

या लेखातून ही तक्रार नाही; तर वास्तव उभे करण्याची धडपड आहे की ज्यातून आपल्या मनात डोकावून बघावेसे वाटेल, वाटावे.

(मलपृष्ठ २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

एकीकडे भाबडी यंत्रशरणता, भाबडी विज्ञान. शरणता आणि दुसरीकडे तितकीच भाबडी नियतीशरणता. धर्म आणि अधर्म, नीती आणि अनिती, विश्वास आणि श्रद्धा यांच्यातील रेषा भिंगाने शोधायला गेलो तरी सापडणार नाहीत. सार्वजनिक रीतीने अशा देवतांचे होणारे उत्सव तर पैशाला पासरी आहेत. एकेकाळी पंधरावी असणारी 'जाहिरात' ही कला ही विकृत चेहरा घेऊनच समोर येते. भाद्रपदात गणपती ते फेब्रुवारीतही गणपती, ऑक्टोबरचे नवरात्र तर मार्चचेही नवरात्र. ज्या चेहऱ्यांचे ठिकाण वस्तुत: पोलीस स्टेशनमध्ये 'वॉन्टेड' च्या यादीत हवे ते चेहरे असणारी मोठाली बॅनर्स (फलक) लावून 'भक्तांच्या स्वागतार्थ' झळकताना दिसतात. या सर्वांमागे असणारे अर्थकारण व त्यातील अर्थ हा तर गहन संशोधनाचा विषय आहे.

हा सर्व अंधारलेला प्रवास पाहिला की राहून राहून वाटते, जुनी सांस्कृतिक मूल्ये, जुने संदर्भ असणारे समाज पुन: निर्माण व्हायला हवेत. गल्लेभरू जाहिरातबाज आणि त्यांनी देशाची केलेली अंतराष्ट्रीय बदनामी ही भयानकच आहे.

याच पार्श्वभूमीवर देऊळ, गाईड सारख्या कलाकृतींचा विचार समाजाने करायला हवा. शांत आणि आकर्षक वाटावी अशा गावांची संस्कृती पार लयाला गेली. नेतृत्वाने कमालीची खालची पातळी गाठली आणि स्वयंपूर्ण खेड्यांच्या भारताचे महात्मा गांधींचे स्वप्न आम्ही इतिहासात जमा केले. आताची खेडी माध्यमांच्या माध्यमातून करता येतील तितकी 'नागर' करण्याचा उद्योग चालू आहे. आमच्याकडील कोणतेही देऊळ पाहा, तीर्थस्थान, धार्मिक स्थळ पहा, आम्ही इतके सवंग बनवले आहे की, देव असेलच तर या अस्वच्छ वस्तीत कसा असेल हा प्रश्न पडतो. मंदिरे, मंदिरे चालवणाऱ्या समित्या, मंदिरांचे गाभारे या प्रत्येक बाबतीत देवाला आम्ही वेसण घालून जणू काही बांधून ठेवले आहे. दिशाच्या अंकातून वारंवार आम्ही आपला समाज दिशाहीन कसा होत चालला आहे ते संपादकीयांतून मांडतो आहोत. यामागे हे सर्व बदलण्याची बुद्धी निदान कोणाला तरी व्हावी ही इच्छा आहे. जादूच्या काडीप्रमाणे एका क्षणात हे बदलणार नाही; पण स्थानिक नेतृत्व सुशिक्षितांच्या हातात गेले तर निदान समाज सुधारणे अशक्य होणार नाही.

इतर सर्व बाबींप्रमाणे 'निधर्मी' राज्य असतानाही आम्ही पवित्रस्थळांनाही राजकारणाचे साधन बनवले आहे 'भावना दुखावल्या' या संकल्पनेलाही आम्ही आमच्या राजकरणासाठी वापरत आहोत. 'देऊळ' चित्रपटातील नाना पाटेकरांची भूमिका आणि दिलीप प्रभावळकरांची भूमिका या दोन भूमिकांमध्ये सामान्य माणूस भरडला जातो, हे अत्यंत चांगल्या प्रकारे दाखवले आहे. अशा कलाकृतींना पारितोषिके देऊन गौरवणारे नेतृत्व, समाज मात्र षंढपणाने व्यवस्था संभाळत बसले आहेत. त्यांच्यालेखी पारितोषिकाचा सोपस्कार झाला की आपले काम झाले. असे न होता यातील मूलभूत विचार शिक्षणातून कसा पाझरेल हे पहायला हवे. हे पाहू शकेल इतके सबळ नेतृत्व हवे.

माणसांचे अस्थिविसर्जन केल्या जाणारी ठिकाणे, तेथे चालणारी कार्ये करणारी 'गुरुजी' नामक माणसे पाहिली. तेथील गर्दी आणि आगतिक माणसे पाहिली की 'गुरांचा कत्तल खाना' म्हणजे काय ते समजू शकते. या सर्वांतून समाज वर यायला हवा आणि त्यासाठी शिक्षण व लोकशिक्षण प्रभाव हवे.

**– मोहन पाठक**

●●●




**वर्ष तेरावे / अंक ३ / मार्च २०१२**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक ९ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | – श्री. मोहन पाठक | |
| २) | माजी जन्मठेप | – कु. निनाद पाटणकर | ३ |
| ३) | शिलामुरेन गवताळ प्रदेशातून फेरफटका | – डॉ. सुधाकर आगरकर | ९ |
| ४) | स्वामी रामतीर्थ (लेखांक ३) | – श्री. शं. बा. मठ | १२ |
| ५) | कवितेच्या गावा जावे… | – कु. सविता घुगरे | १७ |
| ६) | भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना | – श्री. यशवंत साने | २१ |
| ७) | २१ व्या शतकातही श्री अरविंद विचारांची समर्पकता | – श्री. नरेन्द्र नाडकर्णी | २७ |
| ९) | अर्धा राहिलेला संग्रहात कुठेतरी सापडलेला लेख… | – मोहन पाठक | ३२ |
| ९) | परिसर वार्ता | – संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून <u>त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही</u>.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर<br>कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२<br>या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.

– संपादक

# माझी जन्मठेप

*सावरकरांनी बोटीतून समुद्रात उडी मारली या प्रसंगाच्या १०० व्या वर्षा निमित्ताने विद्या प्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या सावरकरांवरील निबंध स्पर्धेतील प्रथम पारितोषिक प्राप्त निबंध. पारितोषिक म्हणून या विद्यार्थ्यांचा अंदमानच्या शैक्षणिक सहलीचा खर्च मंडळाने केला. - संपादक*

**प्रास्ताविक :**

कवी मनमोहन यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर व हनुमान या वीरांची पुण्यस्मृती एका कवितेतून जागविली असल्याने आपणा सर्वांस माहीत आहे.

***''विश्वात फक्त आहेत। विख्यात बहादूर दोन।।***
***जे आईसाठी गेले। सागरांस पालांडून।***
***हनुमानानंतर आहे। विनायकाचा मान।।''***



वीर हनुमानाप्रमाणे वीर सावरकरही मातेसाठी समुद्र उल्लंघून गेले. हे तर खरेच. हनुमंताने जन्मल्याबरोबर सूर्यबिंब ग्रासण्यासाठी झेप घेतली तर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी शैशवातच स्वातंत्र्यसूर्याचा ध्यास घेतला होता. मातृभुमीच्या मुक्तीसाठी, पंधराव्या वर्षी अष्टभुजादेवीच्या मूर्तीसमोर सावरकरांनी घेतलेली शपथ सर्वश्रुत आहे.

***''मारिता मारिता मरेतो झुंजेन।''***

हे झाले 'माझी जन्मठेप' या आत्मकथेच्या लेखकाविषयी सारांशरूपाने त्यांच्या 'माझी जन्मठेप' यावर लिहावयाचे म्हणजे ''सागरास ओंजळीत पकडण्याचा प्रयत्न करणे.''

दोन जन्मठेपेच्या शिक्षा भोगण्यासाठी अंदमानास जाणे म्हणजे कणाकणाने झिजणे आणि क्षणाक्षणाने मरणेच नव्हे का? पण या शिक्षा ऐकूनही विचलित न होता सावरकर प्राप्त प्रतिकूल परिस्थितीवर मात कशी करता येईल, याचाच विचार केवळ २७ व्या वर्षी करू शकले. यातच त्यांचे अद्वितीय मनोधैर्य दिसते.

•• •• ••

ह्या आत्मकथनातील पानापानांतून त्यांनी सोसलेले अपार शारीरिक कष्ट, मानसिक यातना, यांचे अंगावर शहारे आणणारे अनुभव तर आहेच परंतु एवढ्या प्रतिकूल परिस्थितीत स्वत: राजबंदी असूनही इतर बंदिवानांसाठी त्यांनी राबविलेले उपक्रम प्रत्येक माणसासाठी बोधप्रदच नाहीत, तर प्रेरणादायी देखील आहेत.

१९४७ च्या १५ ऑगस्टला डॉ. राजेन्द्र प्रसाद यांनी क्रांतिकारकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. आजही अंदमानाच्या कारावासाच्या प्रांगणात प्रतिदिनी प्रकाश - ध्वनी कार्यक्रम होतो व श्रोत्यांना ऐकवितात -

***''माँ की उम्मीदोंपर ना कोई डाले पानी।***
***जिंदगीभर भेजकर हमे काले पानी।।***

आज तिथल्या विमानतळाचे 'वीर सावरकर विमानतळ' हे नामकरण झाले आहे त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे याच वर्षी तिथे भारताचे समर्थ संरक्षण केन्द्र उभे रहाणार आहे. शतकापूर्वीचे सावकरांचे जीवनप्रवास धि:काराकडून स्वीकाराकडे आणि उपेक्षेकडून सत्काराकडे झाला आहे, असाच निष्कर्ष निघतो ना?

**निबंध :**

हिंदू हृदयसम्राट स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी लिहिलेल्या 'माजी जन्मठेप' ह्या आत्मकथेचा पूर्वाध प्रथम 'केसरी' साप्ताहिकातून १९२५ – २६ व उत्तरार्ध मुंबईच्या 'श्रद्धानंद' ह्या साप्ताहिकातून २०. ०१. १९२७ पासून क्रमश: प्रसिद्ध झाला. परकीय ब्रिटिश साम्राज्यसत्ते विरुद्ध बंड पुकारल्याच्या आरोपावरून श्री विनायक दामोदर सावरकर यांना दोन जन्मठेपींची शिक्षा ब्रिटिशांच्या राज्यातील न्यायालयाने दिली. २४ डिसेंबर १९०९ ला नाशिक येथे झालेल्या जॅक्सनच्या वधाला लंडनमधे असूनही साहाय्य केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. ह्या नाशिक कटाच्या खटल्यात एकूण ३८ आरोपी होते. आणि ३८ वे आरोपी स्वत: सावरकर होते! ब्रिटीशसरकार विरुद्ध युद्ध पुकारण्यासाठी शस्त्रास्त्रे जमवून कट करणे हा आरोप सर्वांवर होता. २४ डिसेंबर १९१० ला मुंबईला उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी निर्णय दिला की, ''विनायक दामोदर सावरकर यास जन्मभर काळेपाण्याची (Transportation For Life) शिक्षा द्यावी. दुसरा खटला चालून त्यातही न्यायमूर्तींनी सावरकरांस दिनांक ३०–०१–१९११ ला दुसऱ्या काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली.

अशा प्रकारे पन्नास वर्षे किंवा दोन जन्म काळ्यापाण्याची शिक्षा परकीय ब्रिटिश साम्राज्या विरुद्ध प्राणपणाने लढणाऱ्या एका महान हिंदू सशस्त्र क्रांतिकारकाला देण्यात आल्या. त्याच जन्मठेपेचे कठोर सत्य असलेले, महाभयानक स्वानुभव सांगणारा हा आत्मकथनपर ग्रंथ वीर सावरकरांनी त्या बंदिवासातून सुटल्यावर १९२४ मध्ये लिहावयास घेतला. मे–जून १९२७ मध्ये ही आत्मकथा पुस्तकरुपाने प्रथम प्रदर्शित झाली. पुढे थोड्याच दिवसात ह्या पुस्तकाचा गुजराती अनुवाद प्रसिद्ध झाला. परंतु त्यानंतर १७.४.१९३४ रोजी ह्या पुस्तकावर सरकारने बंदी घातली.



मराठी भाषेत सहा – सात वर्षे हे पुस्तक प्रचलित असतांना ही यावर बंदी घालावी असे शासनास वाटले नाही हे विशेष! ही बंदी उठविण्यासाठी अनेक व्यक्तींनी, संस्थानी सतत प्रयत्न, मागण्या, निवेदने, आवदने, घोषणा करून अखेर २२. ०५ . १९४६ ला वीर सावरकरांच्या पुस्तकांवरील बंदी उठविण्यात आली. थोड्याच दिवसांत ह्या पुस्तकाची गुजराती, कानडी आणि इंग्रजी आवृत्ती ही काढण्यात आली. पण गांधीवधानंतर पुन्हा ह्या पुस्तकाची खरेदी करण्यास वाचक दचकू लागले! त्यामुळे हिंदी आवृत्ती थोडी उशीरा निघाली.

हे अनुभव, केवळ बंदिवासातील कष्टांचे हृदयद्रावक वर्णन करणारे नाही तर भयंकर आपत्तीतही माघार न घेता किंवा शरण न जाता झुंजत राहण्याची स्फूर्ती देणारे आहेत अेवढेच नव्हे तर आपल्यापुढील अनेक प्रश्नांवर योग्य ते उपायही हे आत्मवृत्त सांगत आहे.

स्वा. सावरकर हे स्वानुभव लिहिण्यास प्रथमत: त्यांच्या संकोची स्वभावाप्रमाणे तयारच नव्हते. परंतु प्रकाशन संस्थापासून ते शालेय मुलांपर्यंतच्या उत्सुक, निष्कपट आणि प्रमळ आग्रहामुळे कालिदासाच्या -

*स्वजनस्य हि दु:खमग्रतो।*
*विवृत्तद्वारमिवोपजायते।।*

या सुभाषिताप्रमाणे ते आपले अनुभव लिहिण्यास तयार झाले. या अनुभवांच्या प्रसिद्धीला सार्वजनिक उपयोग फार मोठा आहे. हे पुस्तक नुसते मनोरंजक न होता बोधप्रद आणि ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे होईल ह्याची जाणीव सावरकरांना निश्चितच होती.

वयाच्या २७ व्या वर्षी सावरकर अंदमानाच्या आजन्म कारावासाचे कैदी झाले. मार्सेलिसच्या बोटींतून निसटण्याच्या प्रयत्नांचे जे काही लाभ झाले त्यांतील एक म्हणजे श्री. सावरकरांना कोणत्याही एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात नेताना नेहमी वेगळ्या मोटारीतून नेले जाई. इतर कैद्यांना पायीच नेले जाई. त्यामुळे सकारण - अकारण पण सर्व बंदिवानांत सावकरांविषयीचा आदरभाव उत्पन्न होऊ नये म्हणून सरकारी अधिकारी कसून प्रयत्न करीत, पण तो आदरभाव वाढतच गेला.

२७-६-१९११ रोजी अंदमानात जाण्यासाठी इतर बंदिवानांसह सावरकरांना ''महाराजा'' नौकेवर चढविण्यात आले. नौकेवर गर्दीच्या जागी त्रास होईल म्हणून बदलून दिलेली जागा ही अत्यंत घाणेरडी - शौचकूपाचे शेजारीच होती त्यावेळी सावरकरांचे मन म्हणे ''जिवंतपणी तुला नरकवास भोगावा लागत आहे. पण त्याचवेळी त्यांचा विवेक म्हणे.'' पण ते तर मानण्यावर आहे. ''सावरकरांनी लहानपणीच ध्येय प्राप्तीसाठी प्रसंगी मरणाला सामोरे जाण्याची मनाची सिद्धता केली होती. ''अनादि मी, अनंत मी, अवध्य मी मला, मारिल रिपु जगति अस्त कवण जन्मला?'' या कवचमंत्राच्या आधारे त्यांनी आत्मबल मिळविले होते. बोटीवरच्या प्रवासात एका कोपऱ्यात त्या घाणीतही सावरकरांना अविचल राहिलेले पाहून बंदिवानांना मोठे आश्चर्यच वाटे.



**सेल्युलर जेल**

विशिष्ट ध्येयाशी, तत्त्वाशी किंवा विचारांशी एकरूप झाल्यामुळेच त्यांच्या आत्मबलाला आशाप्रवणतेची साथसंगत होती, अन्यथा त्यांची विनोद बुद्धी आणि हजरजबाबीपणा ही मोठी शिक्षा ऐकल्यावर जागृत राहिला नसता. एका ब्रिटिश अधिकाऱ्याने सावरकरांना जेव्हा सांगितले की, ''१९६० साली ब्रिटीश सरकार तुम्हांला नक्की सोडेल.'' तेव्हाच सावरकर उत्तरले. ''कदाचित मृत्यू त्यापूर्वीच माझी सुटका करेल. दुसऱ्या प्रसंगी सावरकर म्हणतात, "Are you sure, that British will rule India up to 1960?"

४.०७.१९११ रोजी 'महाराजा' बोट अंदमानास पोहोचली. सावरकरांची आत्मप्रवणताही आपणा सारख्यांच्या लक्षात न येण्याइतकी उच्च कोटीची होती अन्यथा अंदमानात पन्नस वर्षांची शिक्षा भोगण्यासाठी हातात थाळी टमरेल नि वळकुटी सांभाळीत सावरकर पहिले पाऊल टाकतात तेव्हा त्यांच्या डोक्यात विचार स्फुरतो, ''पूर्वेकडील हा अंदमान निकोबार द्वीपपुंज म्हणजे हिंदुस्थानाच्या पूर्व समुद्राची व्दारेच होत - माझ्या देशाचे हे पूर्वेकडील उत्तम नाविक ठाणे होईल.'' सावरकरांनी

''प्रतिकूल तेच घडेल'' हे गृहीत धरून त्याच्या प्रतिकाराची मनाची सिद्धता करून ठेवावयाची हा स्वत: साठी नियम करून ठेवला होता आणि तो त्यांना अनेक संकटांत अत्यंत उपयोगी पडला.



**स्वातंत्र्यवीर सावरकर**

सावरकर अंदमानाच्या कारागृहात गेल्यापासून त्यांच्या वर्तणुकीचा, धैर्याचा इतर सर्व कैद्यांवर खूप चांगला परिणाम झाला. कुठल्याही शिक्षेने खचायचे नाही यातनांसमोर माघार घ्यायची नाही की, ध्येयमार्गापासून एक इंचही ढळायचे नाही. अशी धीरगंभीर वृत्ती, अशी अत्युच्च कोटीची निर्धारशक्ती सावरकरांच्या रूपाने सर्वांना साक्षात्कार देऊन गेली. त्यातूनच दृष्टदानवांशी अफलातून कलगीतुरे झडले. उल्हासकर दत्त या राजबंद्याला जेव्हा वेड लागले, तेव्हा अंदमानाच्या सर्वेसर्वाने म्हणजे बारीने सावरकरांना विचारले, ''काय हो तुम्हांला वेड कधी लागणार?'' सावकर उत्तरले, ''तुम्हांला लागल्यावर.''

अंदमानातला एकान्तवास, तिथली दंडाबेडी व हातबेडी, कोलूचा घाणा, कदान्न अशा कैक यमयातनांना सावरकर पुरून उरले. त्यांची प्रज्ञा, प्रतिभा, ऊर्जा ही सारी त्यांची वैयक्तिक पुंजी निखळ अलौकिक ठरली. ह्याच बळावर घायपातीच्या काट्यांनी आणि अणकुचीदार दगडांनी भिंतीभिंतीवर ''कमला'' सारखी महाकाव्ये कोरली गेली, साक्षरता प्रसार झाला, शुद्धीकरणे झाली, कैद्यांचे अपूर्व संघटन झाले व कारावासाचा आमूलाग्र कायापालट झाला. अंदमानातील प्रतिकूल परिस्थितीत सावरकरांनी कैद्यांमध्ये साक्षरता प्रसार करण्याचा ध्यास घेतला. ''उद्या देश स्वतंत्र झाला तर राज्यकारभार करण्यासाठी ज्ञानी माणसे आवश्यक ठरतील.'' ज्ञानयुक्त कर्मच देशाला तारील हा सावरकरीय हट्ट अंदमानातल्या बंदिवानांवर अनमोल संस्कार करता झाला. सावरकरांच्या लक्षात आले की त्या भयाण वातावरणातही मुसलमान हिंदूवर दंडेली करायचे आणि हिंदू मात्र या दांडगाईसमोर शरणागती स्वीकारायचे. सावरकरांनी या बाटवावाटवीच्या विरोधात रण छेडले आणि जे हिंदू इस्लामचे अनुयायी झाले होते त्यांच्या शुद्धीकरणासाठी चंग बांधला. बेगडी पुरोगामी अंदमानमधेही होतेच. 'माणसामाणसात भेद कशाला करायचा? कोणी हिंदू मुसलमान झाला तर बिघडले कुठे? सावरकरांचा या संदर्भातला तर्क जबरदस्त होता. वाल्याचा वाल्मिकी होतो व त्याच्या लेखणीतून रामायण लिहिले जाते हे विसरू नका. शेवटी संख्याबळ महत्त्वाचे.

या कारावासात पहिल्याच वर्षी सावरकरांना मुंबई विद्यापीठाकडून पत्र आले. व त्यांची बी. ए. ची पदवी रद्द झाल्याने त्यांना कळाले. पण या वैयक्तिक नुकसानीवर शंभर टक्के इलाज करणारी मात्रा म्हणून त्यांना बातमी मिळाली की, बंगालची फाळणी शासनाने रद्द केली आहे. हिंदूराष्ट्राच्या सौख्यासाठी व्रतस्थ बनलेल्या सावरकरांना या बातमीमुळे पदवी रद्द झाल्याचे शल्य सर्वार्थाने शुल्लक वाटले.

सावरकरांनी सर्व कैद्यांना सूज्ञ बनवलेच शिवाय निराश कैद्यांना आत्महत्या करण्यापासूनही परावृत्त केले, अन्य भयंकर अपराध करून शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांना सुद्धा राष्ट्रप्रेमाचे धडे शिकवून, त्यांच्यातील माणूस जागा करून, त्यांचे खऱ्या अर्थाने पुनरुज्जीवन केले. आपले शत्रुत्व परक्या राजवटीशी आहे पण अंदमानमधले यच्चयावत कैदी

आपले जिवलग सहकारी आहेत असे ते मानीत. प्रसंगी आपल्या कपड्यांबरोबर त्यांचे कपडेही ते धूवून टाकीत असत स्वत: राजबंदी असून त्यांनी अंदमानातील कैद्यांच्या पुनर्वसनासाठी केलेले प्रयत्न केवळ आपणास स्तिमित व नतमस्तक करणारे आहेत. स्वातंत्र्यवीरांनी या सहकाऱ्यांवर अपार माया केली. ''आज जगी या ठरलो वेडे, गातिल आमुचे उद्या पोवाडे '' अशा आशयाचा भक्कम आशावाद या वीराने सर्व राजबंद्यामध्ये जागविला.

अंदमानासारख्या काळकोठडीतून जीवंतपणी सुटण्याची पुसटशीही शक्यता नसताना कैद्यांनाच संघटित करून सावरकरांनी विविध उपक्रम प्रभावीपणे आणि यशस्वीरित्या राबविले त्यातील काही महत्त्वाच्या उपक्रमांचे सविस्तर वर्णन केल्याशिवाय हा निबंध पूर्णच होऊ शकत नाही.



धर्मांतरास केलेल्या विरोधाचा उल्लेख वर केलाच आहे. परंतु मुसलमान कैद्यांनी हिंदू कैद्यास काहीतरी कपट करून सांगावे की तू मुसलमान झालास आणि बाकी हिंदू कैदी देखील ते मान्य करत अशा कैद्यांची शुद्धीकरण मोहीम सावरकरांनी हाती घेतली. आपले प्रगत असामान्य विचार अशिक्षित – रांगड्या कैद्यांस पटतील अशा भाषेत समजावून त्यांना स्वत:चे म्हणणे ऐकण्यास प्रवृत्त करणे. तेही प्रतिकुल परिस्थितीत हे केवळ सावरकरांसारख्या महा– मानवासच शक्य झाले.

दुसरे महत्त्वाचे काम – साक्षरता प्रसार. कैद्यांना त्यांच्या भाषेत लिहिण्या – वाचण्यास शिकवूनच सावरकर थांबले नाहीत तर राजबंदिवानांना पुस्तके वाचण्याची परवानगी सरकारकडून मिळवून तिथे एक उत्तम वाचनालय त्यांनी अस्तित्वात आणले जे – जे आपणांसि ठावे, ते – ते इतरांसी सांगावे। शहाणे करून सोडावे, सकलजन ही समर्थांची उक्ती सावरकरांनी प्रत्यक्षात खरी करून दाखविली.

तिसरा उपक्रम म्हणजे संपर्क यंत्रणा. उपलब्ध सामग्रीच्या माध्यमातून म्हणजे हातबेडीचा केलेला विशिष्ट लयीतील वापर ही तेथील कैद्यांमधील सांकेतिक भाषा बनली. दोन मजल्यांवरचे कैदी देखील – एकमेकांशी विशिष्ट ठिकाणी कान लावून बोलू शकत असत. अंदमानाचा बंदिपाल क्रूर आयरिश अधिकारी बारीबाबा सारख्याच्या परीक्षप्रभावी संदेश– वहन यंत्रणा राबविणे हेही महामानवाचेच लक्षण नव्हे का?

चौथा उपक्रम म्हणजे भाषाभिमान मराठीविषयी, महाराष्ट्राविषयी तसेच मराठी माणसांविषयी सावरकरांच्या हृदयी अत्यंत प्रेम होते परंतु जेव्हा भारत स्वातंत्र होईल तेव्हा भारताची राष्ट्रभाषा केवळ हिंदीच असेल हे भाकित त्याचवेळी सावरकरांनी करून ठेविले होते आणि ही भाषिक चळवळही त्यांनी अंदमानात सुरू ठेवली. तेथील बंदिवानांस ते हिंदीतूनच शिक्षण घेण्याचा आग्रह करीत. हिंदूराष्ट्र जिवंत ठेवायचे असेल तर हिंदीतून शिक्षण प्रत्येकास अनिवार्य केले पाहिजे असे ते म्हणत.

सावरकरांच्या अंदमानातील ९ – १० वर्षांच्या वास्तव्यात त्यांच्या संपर्कातील, म्हणजेच तेथील सर्व बंदिवान राजकीय चळवळीत सामील होऊन या चळवळीला गती प्राप्त झाली. याचे ठळक उदाहरण म्हणजे लोकमान्य टिळकांचे देहावसान झाल्याने तेथील सर्व बंदिवानांनी एक दिवसाचा उपवास केला.

राजकीय चळवळ प्रभावी होत चालल्याने तसेच राजकीय पुढाऱ्यांचा दबाव आणि अंदमानातील बंदिवानांना होणाऱ्या छळाच्या बातम्यांमुळे उठलेला जनक्षोम, बंदिवानांनी सतत केलेले अर्ज - आवेदने इत्यादींचा समग्र विचार करून त्यावेळच्या सरकारने आपले कैद्यांविषयीचे धोरण थोडे सौम्य केले. दरम्यान अंदमानाचे 'कारागृह' देखील बंद करण्याविषयी सरकार विचार करीत होते.

अखेर एक दिवस कमिशनरच्या कार्यालयात हिंदुस्थान सरकारची आज्ञा आली का, ''सावरकर बंधूना हिंदुस्थानात धाडा. ''अशी चिठ्ठी वार्डरकडून सावरकरांना मिळावी. पण त्यातील कटुसत्य हेच होते की, अंदमानातुन त्यांची सुटका न होता. पण ४.०७.१९११ रोजी बंद झालेल्या अंदमानच्या सेल्युलर जेलचा दरवाजा आशा नसताना २.०५.१९२१ ला पुन्हा उघडला आणि आलेल्या ''महाराजा'' बोटीनेच सावरकरद्वय मरणाच्या सीमेतून जीवनाच्या सीमेत पुन्हा पाय टाकते झाले.

''माझी जन्मठेप'' हा ५२३ पानांचा स्वानुभव कथन करणारा आत्मचरित्रपर ग्रंथ वाचताना विविध भाव-भावनांचा कल्लोळ मनात माजला. एका अद्वितीय, अलौकिक, असामान्य महामानवाची ही गाथा प्रत्येक भारतीयाने तर वाचावीच आणि त्यावर विचार करावा. त्यांच्या शतकापूर्वीच्या विचारांच्या आचरणानेच भारत महासत्ता बनेल ह्यात शंका नाही. शतकाच्याही पुढचा विचार करणाऱ्या या द्रष्ट्या पुरुषाविषयी मी एवढेच म्हणू इच्छितो.

''अढळ ध्रुवासम तू मृत्युंजय, प्रकाश भूवर हे बलवंता। युगायुगातील नव मानवता, गर्जत राहिल तव जयगाथा ।।''

**कु. निनाद पाटणकर**
**T. Y. I. E.**
**वि. प्र. मं. चे. तंत्रनिकेतन, ठाणे**

●●●

## वास्तु शास्त्र

## चार दिशांचे महत्त्व

**जप :** पूर्व दिशेला तोंड करून जप केल्यास कार्यसिद्धी होते. पश्चिम दिशेला तोंड करून जप केल्यास धनप्राप्ती होते. उत्तर दिशेला तोंड करून जप केल्यास शांती मिळते. दक्षिण दिशेला तोंड करून जप केल्यास प्रत्येक कार्यात विघ्न येते.

**भोजन :** पूर्व दिशेला तोंड करून जेवण केल्यास आयुष्य वाढते. पश्चिमेला तोंड करून जेवण केल्यास धनप्राप्त होते. उत्तरेला तोंड करून जेवण केल्यास सत्याचे पालन होते. दक्षिणेला तोंड करून जेवण केल्यास यशाची प्राप्ती होते.

**झोप :** पूर्वेला व दक्षिणेला डोके ठेवून झोपल्यास आयुष्यात वाढ होते. पश्चिमेला डोके करून झोपल्यास चिंता वाढते. उत्तरेला डोके ठेवून झोपल्यास प्राण तत्त्वाचा नाश होतो. म्हणून उत्तरेला डोके ठेवून कधीही झोपू नये.

संग्रहातून

●●●

# शिलामुरेन गवताळ प्रदेशातून फेरफटका

*शिलामुरेन या गवताळ प्रदेशाचे हे प्रवास वर्णन – संपादक*



**शीला मूरेनमध्ये स्वागत**

चीन हा आपला शेजारचा देश. आकार आणि लोकसंख्येने मोठा. तेथील कम्युनिस्ट राजवट, त्या देशाने अलिकडच्या काळात केलेली आर्थिक प्रगती याचे अनेकांना कुतूहल असते. चीनचा परिसर विस्तीर्ण असल्याने त्यात अनेक भौगोलिक विभाग आढळतात. यांतील अनेक प्रदेशांना भेट देण्याची संधी मला मिळाली. तीन वर्षापूर्वी गोबी वाळवंटातील ऊरूम्ची शहराला जाऊन आलो. अलीकडेच ऑगस्ट २०११ मध्ये उत्तर पूर्वेच्या गवताळ प्रदेशात जाण्याची संधी मिळाली. किशोरांसाठी नवनिर्मिती स्पर्धा दरवर्षी चीनमध्ये आयोजित केली जाते. २०११ मध्ये भरलेली स्पर्धा २६ वी असून तिचे आयोजन होहोट या शहरात करण्यात आले होते. होहोट हे चीनच्या उत्तर पूर्व भागात वसलेले एक ऐतिहासिक शहर आहे. आंतर मंगोलिया या राज्याची ती राजधानी आहे. राज्याच्या नावावरूनच हा प्रदेश मंगोलिया देशाच्या जवळ असावा याची कल्पना येते. मंगोलिया हा मेंढपाळांचा देश. येथे विस्तीर्ण गवताळ प्रदेश आहेत. त्यांतील शिलामुरेन (Xilamuren) या गवताळ प्रदेशाला भेट देण्याचा योग आला. या भेटीचे धावते वर्णन देण्याचा मी या लेखात प्रयत्न करीत आहे.



**डोगर दऱ्यांतून जाणारा रस्ता**

नवनिर्मिती स्पर्धेची सुरूवात ४ ऑगस्टला झाली. दुसरा दिवस परीक्षणाचा होता. त्यावेळेस फक्त विद्यार्थ्यांनाच प्रदर्शनाच्या ठिकाणी प्रवेश होता. सोबत आलेल्या सर्व मोठ्या मंडळीसाठी दिवसभराचे सहलीचे आयोजन करण्यात आले होते. आयोजकांनी विचार करून सर्व आंतरराष्ट्रीय सभासदांना होहोट शहराजवळील गवताळ प्रदेशात घेऊन जाण्याचे ठरविले. सकाळी ९ वाजता निघायचे असे आम्हांला बजावण्यात आले होते. त्यानुसार न्याहारी आटोपून आम्ही वेळेच्या आत तयार झाले. बरोबर ९ वाजता दोन बसेस निघाल्या. ठरलेल्या गवताळ प्रदेशात पोहोचेपर्यंत साधारणपणे दोन तास लागले. हा प्रवास अतिशय सुखकर होता. आठ लेनच्या रस्त्याने आम्ही प्रवासाला सुरुवात केली. पुढे ६ लेनच्या रस्त्यावर

चालकाने गाडी वळवली. काही वेळानंतर आम्ही चार लेनच्या रस्त्यावर होतो. जसे आम्ही गवताळ प्रदेशाच्या जवळ पोहोचलो तसे दोन लेनच्या रस्त्याने आमचा प्रवास सुरू झाला. रस्त्याच्या लेनची संख्या जरी कमी झाली तरी रस्त्याच्या गुणवत्तेत कोणताच फरक पडला नाही. सर्व रस्ते सुस्थितीत होते. कोठेही खड्डा शोधूनदेखील सापडत नव्हता. चालकाला कोठेही थांबाचे लागले नाही. एका ठराविक वेगाने अगदी आरामात तो गाडी चालवत होता.



**गवताळ प्रदेशातील रिझॉर्ट**

होहोट हे शहर सपाट जमिनीवर आहे. जसे आम्ही शहराच्या बाहेर पडलो तसे आम्हांला डोंगराचे दर्शन झाले. थोडासा प्रवास आम्हांला डोंगर दऱ्यांमधून करावा लागला. पुढे पुन्हा सपाट प्रदेश. या प्रदेशात शेती केली जाते. मका, कडधान्ये, भाजीपाला याची पिके आपल्याला दिसतात. साधारणपणे एक तास प्रवास केल्यानंतर एक औद्यागिक वसाहत दिसली. तेवढेच काय ते शहरीकरण. बाकीचा सगळा भाग ग्रामीणच आहे. मातीने बांधलेली कौलांची घरे या खेड्यात आपल्याला पाहायला मिळतात. आणखी अर्धा तास प्रवास करून आम्ही पुढे गेलो तर शेत नाही की गाव नाही. सर्वत्र गवतच गवत, असा प्रदेश आमच्या नजरेस पडला. या गवताळ प्रदेशात पर्यटकांच्या सोयीसाठी लहान लहान झोपड्या बांधलेल्या आहेत. त्यांचा आकार मंगोलियन लोकांच्या घरासारखा असतो. मोकळ्या मैदानात बांधलेली ही पांढरी घरे आपले लक्ष वेधून घेतात. अशी अनेक प्रकारची हॉटेल तिथे आहेत. त्यांतील एका हॉटेलपाशी आम्हाला नेण्यात आले.

आम्ही बसमधून खाली उतरलो तर स्वागताचा कार्यक्रम सुरू झाला. रंगीबेरंगी कपडे घातलेल्या मंगोलियन युवती आमच्या स्वागतासाठी तयार होत्या. त्यांतील एक लहानशा पेल्यातून मंगोलियन बाईन देत असे तर दुसरी गळ्यात पांढरा दुपट्टा टाकत असे. सर्वांचे स्वागत पूर्ण झाल्यानंतर आम्हांला एका झोपडीत चहापानासाठी पाचारण करण्यात आले. चिनी पद्धतीनुसार चहाचे रंगीत पाणी (ज्यात साखर नाही आणि दूध नाही) तिथे ठेवलेले होते. रंगीबेरंगी वस्त्र परिधार केलेल्या युवती आग्रहाने सर्वांना चहा देत होत्या. त्याचबरोबर टेबलावर दुधापासून बनविलेले अनेक पदार्थ ठेवलेले होते. हे सर्व गोड पदार्थ होते. मला गोड पदार्थ आवडत असल्याने मी त्यांच्यावर यथेच्छ ताव मारला.



**स्वागत करणाऱ्या मुली**

चहापानानंतर त्या परिसरात असलेल्या मंदिराला भेट देण्याचा कार्यक्रम होता. परत आम्ही बसमध्ये बसलो आणि त्या मंदीराजवळ पोहोचलो. मंदिर कसले? दगडाचा ढीगच तो. अनेक आकाराचे दगड एकावर एक रचून मंदिराचा आकार तयार करण्यात आला होता.

त्याच्याभोवताली भक्तांनी रंगीत कापड बांधलेले होते. लक्ष वेधून घेणारी गोष्ट म्हणजे तिथे त्रिशुळासारखे खांब उभे रोवलेले होते. त्यांच्याबद्दल मी चौकशी केली पण हाती काही लागले नाही. मंदिराचा परिसर उंचीवर असल्याने आजूबाजूचा विस्तीर्ण प्रदेश आपल्या नजरेत येतो. सगळीकडे गवतच गवत, ना डोंगर ना इमारती. थोड्याच वेळात मंदीर दर्शन संपवून आम्ही परत आलो. त्यानंतर जेवणाची व्यवस्था करण्यात आली.



**लहान लहान दगडांचे मंदिर**

घोड्यावर स्वार होऊन गवताळ प्रदेशात फेरफटका मारणे हा या परिसरातला आवडता उद्योग. यासाठी प्रत्येक रिसॉर्टजवळ घोडे आणि त्यांचे मालक उपस्थित असतातच. आमच्यासाठी देखील घोडेस्वारीची व्यवस्था करण्यात आली होती. आमच्यापैकी कोणीच या कलेत तरबेज नव्हता. अशा नवख्या मंडळीना घोड्यावर कसे बसवावे याचे कसब तिथल्या लोकांना चांगले आहे. त्यांनी अनेकांना घोड्यावर बसून फेरफटका करून आणला. हे सगळे होईपर्यंत परत निघण्याची वेळ झाली. बरोबर ३ वाजता आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो.

कोणत्याही शहरात गेलो की आपण शहरातील इमारती, बाजार, प्रेक्षणीय स्थळे बघण्याचा प्रयत्न करतो. क्वचितच शहराच्या बाहेर जाऊन आजूबाजूचा परिसर आपण पाहतो. ही दुर्मीळ संधी आम्हांला मिळाली होती. शाळेत शिकत असताना अनेक गवताळ प्रदेशांची नावे पाठ केली होती. त्यांतील एकही कधी प्रत्यक्ष पाहिले नव्हते. गवताळ प्रदेश पाहण्याची ही माझी पहिलीच वेळ होती. पहिल्या भेटीचे कौतुक असतेच. तसेच ते मलाही आहे. हे वर्णन आपल्याला नक्कीच आवडले असेल अशी मी आशा बाळगतो.



**परतीच्या प्रवासातील एक दृश्य**

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

दिशा संपर्क दूरध्वनी
०२२-२५४२ ६२७०

# स्वामी रामतीर्थ


(लेखांक ३)

*स्वामी रामतीर्थांवरील लेख मालेतील तिसरा लेख या लेखातील प्रश्न जाणून घेतल्यावर त्यावर विचार केल्यास आपण नक्कीच अंतर्मुख होतो. – संपादक*

**ते कसे शिकवीत :**

तीर्थराम यांनी स्वतःला मी म्हणण्याचे सोडून दिले. राम म्हणतो, राम बोलतो असे म्हणू लागले. खऱ्या अर्थाने रामच सगळे करतो 'मी' ला थारा कुठे आहे. श्री कृष्णाच्या पवित्र दर्शनानंतर त्यांच्या वाणीची मधुरता खूपच वाढली. गणित शिकविताना ते विद्यार्थ्यांना कृष्ण परमात्म्याचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न करीत.

त्यांनी विद्यार्थ्यांना विचारले बिंदू म्हणजे काय? विद्यार्थी म्हणाले ज्याला लांबी रूंदी नाही त्याला बिंदु म्हणावे. तीर्थरामने खडूने फळ्यावर एक बिंदू काढला व म्हणाले हा बिंदू आहे. पण या बिंदूची लांबी रूंदी सहज मोजता येई. असे जरी असेल तरी बिंदु हा मानावाच लागतो. तीर्थराम म्हणाले, तो मानावा लागतो तो असत नाही. असेच देवाचे आहे. ईश्वर मात्र असेच आपण सांगतो. या प्रतिमा दूर केल्या की खरा देव भेटतो. आवश्यकता आहे प्रखर प्रयत्नांची. असे दोन महाबिंदू विश्वाच्या पसाऱ्यात आहेत. अगदी लहानातलहान अंतर दर्शविणारी म्हणजे सरळ रेषा त्याला भक्ती म्हणतात. भक्ती सरळ रेषेसारखी आहे. प्रत्येक माणसाने सरळ वागण्याचा प्रयत्न केल्यास तो ईश्वराच्या जवळ जाऊ शकतो, परंतु या सरळ रेषेचा त्रिकोण झाल्यास त्याचे फार हाल होतात.




'डफ' ही मूळची रेषा . सत्व, रज, तम या गुणामुळे या रेषेचा अबक त्रिकोण होतो. त्या त्रिकोणाच्या मागे परमेश्वर आहे (गुणातीत) हा त्रिकोण भगवंताच्या प्रेमामुळे नाहीसा होतो. अ, ब हा तमोगुण, ब, क हा रजोगुण. तम व रज यांचा निरास झाला की अ, क ही रेषा अ; ड होते आणि ब, क ही रेषा बनते त्यामुळे कोन कोपरे नाहीसे होऊन सत्वगुणाचा स्पर्श झालेली डफ अशी सरळ रेषा बनते. सरळ रेषा म्हणजे भक्ती. ज्याचे रज, तम, सत्वशील झाले तो भक्त होतो. अशी सरळ रेषा बनते. सरळ रेषा म्हणजे भक्ती. ज्याचे रज, तम, सत्वशील झाले तो भक्त होतो. अशा उदाहरणाने त्यानी वेदान्त विषय आपल्या विद्यार्थ्यांना पढविला.

व्याख्यानाच्या निमित्ताने त्यांना खूप प्रवास केला. कॉलेजला सुटी असेल त्यावेळी वृंदावन, मथुरा, काशी, कुरुक्षेत्र हृषीकेश अशा पवित्र ठिकाणी जात. तेथे विद्वता प्रचुर व वेदान्त रसपूर्ण व्याख्याने देत.

**महापुरुष संश्रय :**

एकदा मथुरेला जाताना समवेत दीनदयाळ शर्मा होते. तिथे त्यांचे व्याख्यान ठरविले. व्याख्यान ऐकून श्रोते मंत्र मुग्ध झाले. त्यांच्या विद्वत्तेची कीर्ती द्वारका पीठाचे श्रीमत्‌ शंकराचा माधवतीर्थ यांच्या कानी गेली. शारदा मठाला भेट देण्यासाठी ते लाहोरला आले होते. तीर्थराम नुकतेच वृंदावनहून लाहोरला परतले होते. सनातन धर्म संस्थेचे कार्यवाह या नात्याने त्यानी श्रीमत्‌ आचार्यांचे स्वागत केले. त्यांच्या परस्पर चर्चेतून आचार्याना तीर्थरामची कल्पना आली. लाहोर मुक्कामात तीर्थराम सतत आचार्यांच्या

सान्निध्यात होते. या सहवासात आचार्यांच्या उपनिषदे ब्रह्मसूत्रे व अद्वैत तत्त्वज्ञानाचे सखोल विवेचन केले. तीर्थरामाला मूळच्या ज्ञानाचा अधिक उजाळा मिळाला.

आचार्य जम्मूस जावयास निघाले त्यावेळी तीर्थरामला बरोबर घेतले. दहा दिवसाच्या प्रवासानंतर ते लाहोरला परतले. आचार्यांच्या सहवासामुळे तीर्थरामाची कृष्णभक्ती, अद्वैत वेदान्त निष्ठा बळावली. अद्वैत तत्त्वज्ञान हा भारताचा फार मोठा ठेवा आहे. त्याची जपणूक प्रत्येक भारतीयाने प्राणपणाने केली पाहिजे.

डि. ए. व्ही. कॉलेजात नारायण दास नावाचा आर्य समाजी एक तरुण शिकत होता. श्रीकृष्ण, भक्ती यांचा त्याला तिटकारा असे. माणसाचा विकास ईश्वरभक्तीत आहे हे मला कुणीतरी पटवून द्यावे, मी त्याचा जन्माचा दास होईन. तीर्थरामाची वेदान्तावरील व्याख्यान होत. एका व्याख्यानाला नारायण दास गेला होता. तीर्थरामाचे मुद्दे आपण खोडून काढावे, भक्ती अद्वैत वगैरे थोतांड आहे हे समाजाला पटवून देऊ, तीर्थरामाचा पराभव करू म्हणून तो व्याख्यानाला गेला होता. तीर्थरामाच्या व्याख्यानानंतर तो पूर्ण विरघळला. तो तीर्थरामाला भेटला त्यांना वंदन केले व त्यांची क्षमा मागितली. त्या दिवसापासून तीर्थरामना त्याने आपले गुरू मानले.

सन १८९५ च्या सुमारास एक आठवड्याच्या मुक्कामासाठी स्वामी विवेकानन्द लाहोरला आले होते. त्यांच्या दर्शनाला तीर्थराम उत्सुक होते. लाहोरला स्वामीजींची तीन व्याख्याने झाली. ती व्याख्याने ऐकून तीर्थराम भारावून गेले. कडकडीत वैराग्य व अव्दैत वेदान्त या दोनही गोष्टींचे स्वामीजींच्या ठिकाणी मिलन झाले होते. तीर्थराम त्यावेळी अवघे २४ वर्षांचे होते. आजवर आपण जीवन व्यर्थ घालवले असे वाटू लागले. स्वामीजीनी व्याख्यानात गौरांग प्रभूचा उल्लेख करून श्रीकृष्णभक्तीत ते कसे अंतर्बाह्य बदलून गेले होते याचे मोठे मार्मिक विवेचन केले. स्वामीजींच्या व्याख्यानाने तीर्थरामांचा स्फुल्लिंग चेतला गेला.

**नोकरी सुटली :**

तीर्थराम यांच्या व्याख्यानांचा लोकांवर विलक्षण परिणाम झाला. मिश्नरी लोकांच्या धर्मांतर क्रियेला खीळ बसू लागली. ख्रिश्चन कॉलेजची नोकरी तीर्थराम यांना सोडावी लागली. दुसरीकडे लगेच त्याना नोकरी मिळाली.

**आजारपण :**

तीर्थरामाना दोन पुत्र होते. मदनमोहन व ब्रह्मानंद अशी नावे होती. ब्रह्मानंदाचा जन्म १८९९ साली झाला. तीर्थराम आणखी विरागी झाले. रिकामावेळ ते वाचन व श्रीकृष्ण चिंतनात घालवत त्याना एकान्ताची ओढ लागली. त्याचवेळी ते आजारी पडले. आजाराचा जोर वाढला. वैद्यांना आजाराचे निदान करता येईना. हात पाय गार पडले. दोन दिवस त्यास्थितीत होते. तिसऱ्या दिवशी शुद्धीवर आले. ताप शमला. दुखण्यातून बरे झाले. ईश्वरी कृपा आहे. त्यांनी आयुष्य वाढवून दिले, असे ते म्हणाले. हे मिळालेले आयुष्य विश्वाच्या संसारासाठी खर्च करण्यात यावे असे त्याना वाटू लागले. ते आपणाला सोडून जाऊ नयेत म्हणून त्यांच्या मित्र मंडळीनी एक मासिक काढावयाचे ठरविले. या मासिकाचे नांव अलीफ. अलीफ म्हणजे पर्शियन आद्याक्षर ही ॐकार मात्रा आहे. मासिकाचे नाव सर्वाना आवडले. सन १८९९ जानेवारीत पहिला अंक निघाला. त्याला प्रचंड मागणी आली. केवळ एका आवड्यात प्रती संपल्या. पुढील अंकी त्याचेच पुनर्मुद्रण करण्यात आले. तो देखील हातोहात खपला. त्यात आनंद हा एकच विषय चर्चिला गेला होता तीर्थरामांचे प्रचीतीचे बोलणे यात अनुवादित झाले होते. हे काम नारायणदास यांज कडे सोपविण्यात आले होते. मासिकाच्या जन्माबरोबर तीर्थरामांनी आपला राजीनामा दिला. हिमालयाच्या परिस जाऊन भगवंतासाठी एकचित्त होण्याचा निश्चय केला.

**हिमालयात प्रयाण :**

स्टेशनवर लोकांची गर्दी झाली. तीर्थराम, पत्नी व दोन मुले गाडीत बसले व त्यानी सर्वांचा निरोप घेतला. ते हरिव्दारला आले. काही दिवस हरिद्वारला राहिले. नंतर पत्नीला मुरालीवाला इथे मुलासह पाठवून दिले. आपण स्वतः पुढील प्रवास चालू ठेविला. गंगोत्रीला जाताना वाटेत टेहरी गाव लागते. रम्यवनश्री मुळे तीर्थरामाना ते गाव आवडले. या गावापासून दोन मैल अंतरावर एका धनिकाने घर बाधले होते. काही न ठेवता सर्व गंगेला अर्पण करण्यासाठी तीर्थरामानी त्याना म्हटले – चोरापासून भीती नाही उपासना चांगली होईल. गंगोत्रीला जाणारे बाबा रामनाथ नावाचे गृहस्थ भेटले. इथे आपण काही दिवस मुक्काम करावे. सर्वांची शिधा इत्यादी व्यवस्था केली व पुनः भेटू म्हणून ते बाबा निघून गेले. मात्र काही दिवसानी तीर्थराम उत्तरकाशी कडे निघाले. तीर्थराम कोठे गेले याचा शोध चालू झाला. अनेक हालआपेष्टा सोसून तिसऱ्या दिवशी ते उत्तरकाशीला पोहोचले. तिथे एक निर्मनुष्य गुहा होती. हे स्थान चांगले म्हणून तेथे ते राहू लागले. नित्य कर्मानंतर ईश्वर चिंतनात कालक्रमणा सुरु झाली. समाधी लागे, केव्हा भानावर येत याचा नेम नव्हता. मिळेल त्यावर निर्वाह करावा, पुनःईश चिंतनात वेळ घालवत. एके दिवशी गुहेच्या तोंडाशी नारायण दास हजर झाले. तीर्थराम त्याना म्हणाले – माझा शोध घेण्यापेक्षा ईश्वराच्या शोधात वेळ खर्ची केलात तर बरे. तीर्थरामाना त्याने घट्ट मिठी मारली. माझा परमेश्वर इथेच आहे. त्याला कुठे सोडणार नाही. नारायणदासाबरोबर तीर्थराम टेहरीला आले. त्यांच्या दर्शनाने सर्वांना आनंद झाला. टेहरीला दोन महिने राहिले. तिथे त्यानी भरपूर लिखाण केले. नारायण स्वामीनी मुद्रित करण्याची जबाबदारी स्वीकारली.

**संन्यास घेण्याची इच्छा**

टेहरीला संन्यास घेण्याची वृत्ती बळावली. त्यावेळी तीर्थराम केवळ २८ वर्षांचे होते. श्रीमत् शंकाराचार्याना वंदन केले व संन्यास घेण्याची इच्छा प्रगट केली. लगेच नाविकाला बोलावून पूर्ण मुंडन करून घेतले. अंगावरची वस्त्रे व यज्ञोपवीत गंगेत टाकली. ॐ उच्चार करीत गंगेत स्नान केले. गंगेच्या काठी ॐ जप पूर्ण केला. जप पूर्ण करून उठले तेव्हा मध्यान्ह झाले. वैराग्याचे तेज झळकत होते. तेथील सर्वांना सांगितले आता राम एकटाच राहणार आहे. भगवांताच्या सेवेत राहून त्याची कृपा संपादन करा. इतके सांगून ते एकटे अरण्यात निघून गेले. गंगेच्या सानिध्यात एक गुहा पाहिली त्यात ते राहू लागले. ते सतत प्रणवाच्या जप करीत. दुपारी मिळतील ती फळे वा अन्न यावर निर्वाह चाले. ते तिथे एकटेच होते. ते संबंध दिवस ईश्वर ध्यानात राहात. कधी काळी नारायण स्वामीनी त्यांच्या संन्याशाची बातमी सर्व स्वकीयांना कळविली, पत्नीलाही बातमी कळली. तिने हाय खाल्ली व आजारी पडली. मुलांना तीव्र दुःख झाले.

**तीर्थसंग –**

संन्यास घेतल्यानंतर त्यांची कीर्ती चोहोकडे पसरली. लोक दर्शनासाठी निरनिराळ्या भागातून येत व शंका विचारीत आणि समाधान करून घेत. ते अत्यंत सोप्या शब्दात मार्गदर्शन करीत. टेहरीचे राजे कीर्तिशहा व त्यांचा परिवार यांची स्वामीवर खूप मर्जी बसली. एकदा राजपुत्र दर्शनाला आला स्वामीना वंदन करून म्हणाला. स्वामी आपण मला परमेश्वराची भेट घडवून द्या. त्या दोघातील संवाद मोठा उद्बोधक होता.

स्वामी – तुझी इच्छा ऐकून मला आनंद झाला. आज हिंदुस्थानात राजा कुणीच नाही राज्य कुणाचे आहे?

राजपुत्र– इंग्रजाचे.

स्वामी– त्यांना कधी भेटलास काय?

राजपुत्र– बरेच वेळा.

स्वामी– त्यांच्या भेटीच्यावेळी काय करावे लागले?

राजपुत्र– प्रथम एका कागदावर स्वतःचे नावलिहून तो शिपायाकडे देणे. तो साहेबाना भेटावेस वाटले तर शिपायाला निरोप देतो. तो शिपाई आपणाला साहेबाकडे घेऊन जातो.

स्वामी– हा कागद घे तुझे नाव पत्ता भेटीचे कारण लिही मी भगवंताचा शिपाई आहे. तुझा कागद नेऊन देतो. राजपुत्राने कागदावर नांव पत्ता लिहून स्वामीकडे दिला. स्वामीने तो पाहिला व ठेवून दिला. अन्य मंडळीशी चर्चा सुरू झाली. राजपुत्राने स्वामींना आपल्या कागदाची आठवण केली. स्वामीनी तो कागद उचलला व त्यावरील नाव मोठ्याने वाचले. व म्हणाले राजपुत्रा हे तुझे नाव नाही.

राजपुत्र– मी माझेच नाव कागदावर लिहिले होते.

स्वामी– तू कोण आहेस? हेच तुला कळले नाही. त्याच्याजवळ त्याचा सेवक उभा होता.

स्वामी– हा सेवक कोणाचा?

राजपुत्र –माझा.

स्वामी– याचा अर्थ सेवक म्हणजे तू नव्हेस. हा भरजरी अंगरखा कोणाचा?

राजपुत्र– माझा.

स्वामी– म्हणजे तू नव्हेस. हे शरीर कोणाचे?

राजपुत्र– माझेच शरीर आहे.

स्वामी– म्हणजे हे शरीर ही तू नव्हेस. मग तू कोण?

राजपूत्र– मी म्हणजे मन आहे.

स्वामी– मनाने तू काय करतोस?

राजपुत्र– चिंतन करतो.

स्वामी– मन हे एक साधन आहे. लिहिण्यासाठी लेखणी तसे चिंतना साठी मन लागते. म्हणजे मन म्हणजे तू नाहीस मग तू कोण आहेस?

राजपूत्र– स्वामी मला नाही समजत.

स्वामी– घोडा व घोडेस्वार यांच्या संबंधाप्रमाणे तू व तुझ्या अवयवांचा संबंध आहे. ही सारी इंद्रिये तुझी असून तू यांचा स्वामी आहेस. तू म्हणशील तशी ती वागतील.

राजपूत्र– होय, स्वामी.

स्वामी– मी देखील टोपणनाव आहे. तू म्हणजे सामान्य नसून तूच भगवंत आहेस. तुझ्या आवतीभोवतीचा पसारा बाजूला कर मग समजेल तूच भगवंत आहेस. निरनिराळ्या भगवंताची भेट घेण्याची काही जरूरी नाही.

**आणखी एक उदाहरण –**

एक विद्यार्थी स्वामीजींना भेटावयास आला; बीज गणितात तो हुशार होता. त्याने स्वामीना वंदन करून शंका विशद केली. विद्यार्थी – स्वामीजी देव आहे पटते पण त्याचे दर्शन होत नाही म्हणून मी काय करावे म्हणजे मला देव दर्शन घडेल? स्वामी हसून म्हणाले बीज गणितातील 'क्ष' ची किंमत काय? विद्यार्थी – 'क्ष' ची किंमत काहीही असू शकते. स्वामी – हे उत्तर बरोबर आहे. तुझ्या समोर जी देवाची प्रतिमा आहेत. त्याला किती किमंत देशील? त्याप्रमाणे देवत्वाचे दर्शन घडले. त्या मूर्तीला दगड मानले तर तिची किंमत दगडाची होईल. आपले प्राण त्या मूर्तीपेक्षा कमी प्रतीचे आहे. असे मानलेस व त्याप्रमाणे वागलास तर त्यामूर्तीत तुला देवाचे दर्शन होईल. आपण ज्या प्रमाणे किंमत देऊ त्या प्रमाणात देव प्रतीत होईल. स्वानीजींचे बोलणे विद्यार्थ्याला पटले.

स्वामीना एकांत हवा होता ते गंगेच्या तिरी असलेल्या गुहेत गेले. त्यांना शोधत नारायण स्वामी आले. भेटीनंतर घडलेली हकिकत सांगितली. ते जन्मोत्रीला निघाले रस्त्यात वाघ भेटला स्वामी म्हणाले श्रीकृष्णा तू या स्वरूपात मला दर्शन द्यावयाचे ठरविले आहेस काय? गर्जना करून तो निघून गेला. काही अंतरावर लांडगा त्यांच्या

मागून आला. बराच वेळ त्यानी स्वामींची सोबत केली स्वामी म्हणाले - मला तुझ्या सोबतीची जरूर नाही तू भक्ष्य शोधण्यासाठी जा. स्वामी एका शिलाखंडावर बसले लांडग्यांनी समोरून पाहिले व निघून गेला. स्वामी म्हणाले अरण्यात श्रीकृष्णाचे विविधरूपात मला दर्शन घडते. वनात भटकण्याचे कारण तेथे भगवंताचे स्पष्ट दर्शन होते. त्यांचा सहवासात राहता येते. तीन दिवसानंतर स्वामी जम्नोत्रीला पोहचले. एका मठात मुक्काम केला. तेथेही लोक दर्शनाला येऊ लागले. स्वामी त्यांचे समाधान करत.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

**गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर**

# कवितेच्या गावा जावे...

*सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाच्या कार्यकारिणी कार्याध्यक्ष श्री. अशोक ठाकूर यांच्या सौजन्याने हा लेख त्यांच्या महाविद्यालयाच्या वार्षिकातून घेत आहोत – संपादक*

***''गेले द्यायचे राहुनी। तुझे नक्षत्रांचे देणे।।***
***माझ्या पास आता कळ्या,***
***आणि थोडी ओली पाने।''***

खरोखर अशी एखादी मन हेलावून सोडणारी कविता वाचली की ती मनाचा ठाव घेते. एकदा वाचली, दोनदा वाचली, तीनदा वाचली तरीही या वेड्या मनाचं समाधान होत नाही. ती पुन्हा-पुन्हा वाचावी, नव्हे; गुणगुणावी, दुसऱ्यालाही ऐकवावी असा मोह होतो. त्या मोहापायी ती कविता आपण दुसऱ्यालाही ऐकवतो आणि मग त्या ऐकणाऱ्याचा चेहरा आनंदानं फुललेला पाहताना कुठेतरी वाटून जातं; आपणही असं काहीतरी लिहावं; दुसऱ्याने ते ऐकावं, प्रसिद्ध व्हावं इतकंच नव्हे तर, कुणीतरी ते आवडलं म्हणूनही सांगावं आणि कवितेच्या गावांत रमून जावं!

***'प्रतिभेला गेले दिवस***
***दृष्टी पावसात न्हाली***
***अपुऱ्या दिवसाचं मूल व्हावं***
***तशी 'चारोळी' झाली!'***

'कविता हे जर कवीचं पूर्ण वाढ झालेलं मूल असेल तर 'चारोळी' ला अकाली जन्माला आलेलं अपत्यच म्हणावं लागेल! मात्र कधी कधी चार ओळींची चारोळी अख्ख्या कवितेला भारी पडते! एकूणच चारोळी कठीण, त्यातही विनोदी चारोळी म्हणजे प्रतिभेच्या बैलाची शेपटी धरणंच होय! मित्रहो, असं जर वाटलं ना, तर त्यात गैर काहीच नाही कारण भवभूतीसारख्या महान कवीलाही ते कधीकधी वाटलं होतं आणि आज 'चारोळ्या' लिहिणाऱ्या आपल्या चंद्रशेखर गोखलेनाही ते वाटलं असेल. आपलं आत्ताचं वय तर असं की 'प्रत्येकजण या वयात कवीच असतो' असं म्हणतात. त्यातलं अशावेळी या मोहापासून दूर न राहता कवितेच्या गावी जाऊन मनसोक्त आनंद लुटावा.

दैनंदिन जीवनातील काही बारकावे अनुभवून, अभ्यासून, हे अनुभव तासून तासून शब्दांच्या कोंदणात बसविले की जो एक काव्यरूप दागिना तयार होतो तो म्हणजेच कविता होय. असे कवितासंग्रह लिहिणारे अनेक महान कवी आपल्याकडे आहेत.

पूर आलेल्या नदीचा प्रवाह जसा काठ जुमानीत नाही तसे रांगडे चैतन्य आणि जोमदारपणा विंदा करंदीकर यांच्या कवितांतून दिसून येतो. विंदाना २००३ सालचा 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळाला. त्यांचे जातक, 'स्वेदगंगा', 'मृद्गंध', 'धृपद' व विरूपिका हे कवितासंग्रह लोकप्रिय आहेत. सत्तेच्या संपर्कात राहणाऱ्या लोकांकडून सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रातल्या माणसांचा केलेला मानभंग, मध्यमवर्गीयांमध्ये आलेली लाचारी आणि दांभिकता या साऱ्याबद्दल मंगेश पाडगावकर यांच्या मनात संताप आहे. याबद्दल त्यांनी 'जिप्सी', 'छोरी', 'उत्सव', 'विदुषक', 'सलाम', 'बोलगाणी' हे संग्रह तर संहिता चे संपादनही पाडगांवकरांनी केले. यशस्वितेचे रहस्य आणि अपयशाची कारणे पुन्हा – पुन्हा शोधावी असे आव्हान जगापुढे ठेवणारे चिं. त्र्यं. खानोलकर यांचे 'जोगवा' 'दिवेलागण' व 'नक्षत्रांचे देणे' हे कवितासंग्रह लोकप्रिय आहेत. केशवसुतांचा 'केशवसुतांची कविता' हा संग्रह

तसेच सावंतवाडीतील कवी वसंत लाडोबा सावंत यांचे 'स्वस्तिक', 'उगवाई', 'देवराई', 'माझ्या दारातले सोनचाफ्याचे झाड' हे काव्यसंग्रह विशेष लोकप्रिय आहेत.

अनेकवेळा आपण आपली 'कविता' नामक गोष्ट दाखवण्यासाठी आपल्याला वाटणाऱ्या कुणा 'काव्यमर्मज्ञाकडे' जातो आणि तो मात्र अगदी त्रासिक चेहरा करून 'हं, आहे ठीक!' असा काहीसा तितपतच अभिप्राय देतो. निराश मनानं आपण घरी परततो आणि ठरवतो कुणाकुणाकडे म्हणून विचारायला जायचं नाही. आता फक्तं मोठ्या कवींनी कवितेच्या निर्मिती प्रक्रियेबाबत काय म्हटलंय तेवढंच पहायचं; पण तिथंही थोडासा धसकाच बसतो, कारण

*'बोलविना धनी वेगळाचि'*

'कविता म्हणजे आकाशींची वीज आहे तिला धरू पाहणारे शेकडा नव्याण्णव आपले हात पोळून घेतात' इथपासून ते

*'अरे घरोटा घरोटा।*
*तयातून पडं पिठी।।*
*तसंतसं गाणं माझं।*
*पोटातून येतं व्हटी।।'*

इथपर्यंत हे अनुभव; इथपर्यंतची ही भाषा; त्यामुळे ती ऐकता अशी काही दमछाक होते की नको ती काव्याची अवघड चढण चढणं, ती अनवट वाट शोधणं असं होऊन जातं. पण ही वाट तशी काही अवघड नसते. फक्त ही बरीचशी मनाच्या पातळीवर घडणारी प्रक्रिया असल्याने आणि मन ही,

*'आता होतं भुईवर,*
*गेलं गेलं आभाळात'*

अशी वस्तू असल्याने त्याला शब्दांच्या चिमटीत पकडून सांगणं काहीसं अवघड बनतं. पण तरीही वाटा, आडवाटा सापडतातच आणि त्या आपण शोधून मांडायला लागलो की इतरांनाही त्या नक्कीच बघाव्याशा वाटतात. काहीवेळा कवितेत सूर्यदेखील लहान असतो. आभाळ अंधारलेले असतांनाही चंद्र आभाळाकडे गहाण असतो तर कधी अंधाराला दृष्टी प्राप्त होते.

पण, खरोखर काव्याची निर्मिती कशी झाली असावी? मला वाटतं की निसर्गाशी एकरूप झाल्यावरच काव्याची निर्मिती होते. ज्याप्रमाणे संत तुकाराम म्हणतात,

*'वृक्षवल्ली आम्हा सोयरे'*

इंदिरा संत म्हणतात,

*'' जरि वेढिले चार भिंतींनी,*
*या वृक्षांची मजला संगत.''*

सामान्य माणूस नेहमीच्या त्रासातून सुटका मिळविण्यासाठी निसर्गाच्या सान्निध्यात जातो. अशा या निसर्गाशी तन – मन – धनाने एकरूप झाले की काव्याची निर्मिती होते. बालकवी हे निसर्गप्रेमी, निसर्गवेडे कवी होते, त्यांनी निसर्गाचे वर्णन करताना एका कवितेत म्हटले आहे की,

*''सुंदरतेच्या सुमनावरचे*
*दव चुंबूनी घ्यावे*
*चैतन्याच्या गोड कोवळ्या*
*उन्हांत हिंडावे.''*

पण मित्रहो, कवितेच्या गावी जाणाऱ्या या वाटा कशा असतात? त्या असतात अनुभवांच्या बाह्य जगातल्या कितीतरी अनुभवांना कधी जाणिवेच्या सरळमार्गाने आत घेणाऱ्या तर कधी नेणिवेच्या चोरदरवाजाने प्रवेश देणाऱ्या, मनाच्या कपाटात बऱ्यावाईट, सुंदर, असुंदर अनेक अनुभवाच्या अनुभूती जतन करणाऱ्या, बाल्यापासून सातत्याने आपल्याबरोबर

त्या चालत राहतात. सभोवतालचं सारं काही पुंजी म्हणून राखून ठेवतात आणि मग कधीतरी,

***'मनात नाही मुळीच माझ्या काही'***

असं म्हणता, म्हणता असं काही सांगून जातात की,

***'वाहव्वा, किती सुरेख कविता!'***

म्हणून समोरच्या व्यक्तीची प्रतिक्रिया उमटते. आपणही चकित होऊन आपल्यालाच विचारतो,

'हे असं कोणी केलं?'
उत्तर येतं,
प्रतिभेनं!
प्रतिभा? ही कोण?
'आपल्याला कविता लिहायला लावणारी!''
संस्कृत साहित्य शास्त्रात तिचं वर्णन आलंय,
'अपूर्व वस्तुनिर्माणक्षम प्रज्ञा म्हणजे प्रतिभा!'

अर्थात अपूर्व असं निर्माण करू शकणारी मन:शक्ती खरं आहे. कवी असणाऱ्या व्यक्तीजवळ अशी काही शक्ती जन्मजात येतेच, पण तरीही हेही लक्षात घ्यायला हवं की तिलाही सर्वस्वी अपूर्व असं काही निर्माण करता येत नाही. ती काव्याच्या रुपात जे अपूर्व असं काही निर्माण करता येत नाही. ती काव्याच्या रूपात जे अपूर्व दाखविते ते जुन्या पूर्वी घेतलेल्या अनुभवांचाच एक सुंदर मेळ असतो. आपण जसे विविधरंगी फुले एका धाग्यात ओवल्यानंतर जशी सुंदर माळ तयार होते त्याचप्रमाणे अनुभव व त्यांच्या जोडीला शब्द असले, शब्दाच्या जोडीला थोडीशी लय असली की सुंदर काव्याची निर्मिती होते.

आपण लहान असताना रंगीत काचांचे तुकडे शोभादर्शकात नव्हतो का घालत? किती नवे नवे आकार उमटायचे त्याचे! काव्याचंही तसंच असतं. आपण आयुष्यात घेतलेले, मनाच्या कपाटात जमवून ठेवलेले कितीतरी रंगीबेरंगी अनुभवांचे तुकडे निर्मितीच्या क्षणी असेच जागे होतात एकत्र आणि दिसतात अपूर्व अशा नव्यानव्या रूपांत कविता बनून. अर्थात हे सारं होण्यासाठी गरज असते जीवनातल्या अनुभवांकडे डोळसपणे पाहता येण्याची, आपल्या पंचेंद्रियांना जिवंत ठेवून प्रत्येक गोष्टीचा मनापासून अनुभव घेण्याची. एकदा का हे इंद्रियाचं जिवंतपण आपल्याला उमगलं की मग बालकवींच्या हिरव्या हिरव्या गार गालिच्याचं हिरवेपण, मृदूस्पर्श शरीराला सुखावून जातो. आपल्या तितक्याच स्नेहार्द्र दृष्टीनं पाहता येतं.

कविता हा जगण्याचा श्वास आहे. आपण आयुष्यात केवळ लेखनच करू शकतो आणि कवी झालो नसतो तर शेती करीत बसलो असतो असे विचार मनात येतात. माझी जन्मभूमी सिंधुनगरीतीलच. या सिंधुनगरीतील अनेक महान महान कवी होते. त्यांचे कवितासंग्रहही अत्यंत लोकप्रिय झाले होते. खरोखर या सिंधुदुर्गात प्रवेश केल्यावर आपण जरी कवी नसलो तरी आपल्याला काव्ये सुचतात.

माझ्या जगण्याला लाभलेली खेडेगांवची पार्श्वभूमी आणि गांवात असलेली भजनी परंपरा, त्यातून मनावर झालेले संस्कार, यामुळे सुरुवातीच्या काळांत काही अभंगात्मक व नंतर चांगली काव्ये बाहेर पडली. मराठी साहित्यात गद्य. पद्य, कादंबरी, नाटके इत्यादी साहित्यसंपदा अस्तित्वात आहेत. खरोखरंच कवितेतूनच साहित्यिक समज वाढत गेली. त्याचबरोबर आपल्याला जे लिहायचे आहे. ते हे नव्हे याची उमज पडली आणि पुन्हा कवितेच्या गावाकडे गेली. चांगली कविता लिहायची असेल तर ती एखाद्या गावात राहूनही लिहिता येत.

प्रत्येक कलाकाराने आपली म्हणून एक भूमिका घ्यायला हवी. प्रत्येक कलाकाराने आयुष्यभर आपल्या कवितेचा रसास्वाद घ्यावा. कलाकाराच्या उच्चारातूनच

त्याची प्रतिमा सहजपणे पुढे येते. कविता हा जन्मभराचा श्वास आहे, ध्यास आहे ती केवळ शब्दाची रोषणाई नाही. व्यवसाय किंवा इतर कारणे ही पुढील वाटचालीसाठी न देता त्यावर मात करून आधिक नेमकेपणाकडे, आशयाच्या वेगळेपणाकडे, शब्दांच्या उत्कट सूचकतेकडे कवीने वळावे. मी जरी विज्ञान युगाचा प्रतिनिधी असले, तरी नव्यातले नवे आणि जुन्यातले नवे यांच्या मिलनातून प्रगतीची पावले आधिक समर्थपणे पडू शकतील यावर माझा विश्वास आहे.

*'कधी कधी कवितासुद्धा*
*वृत्त छंद लय विसरते,*
*पद्यामध्ये पेंगत पेंगत*
*गद्यामध्ये घोरत बसते!'*

प्रत्येकजणालाच कविता करताना त्या त्या प्रतिभाभिन्नतत्त्वानुसार ती ती गोष्ट वेगवेगळी दिसेल, वेगवेगळी भासेल. कुणाला तिचा प्रकाशमय भागच तेवढा दिसेल आणि तो 'आनंददायी' बनून जीवनाचं गाणं गात सुटेल तर कुणाला तिच्यातल्या अंधाराचाच फक्त प्रत्येय येईल आणि तो,

*'त्या उजाड माळावरती,*
*बुरुजाच्या पडल्या भिंती'*

असं उद्‌ध्वस्ततेचं गाणं गाईल; पण गाणं गाईल एवढं मात्र नक्की. म्हणून मित्र हो, अवती - भवती संवेदनशील मनानं पाहिलं पाहिजे. गायलं पाहिजे, म्हणजे लय आपोआप सापडते. मनाच्या गाभाऱ्यात कधी शांत भावनेचा नंदादीप लागतो तर कधी

*'डमडमत डमरु ये'*

असे म्हणत रुद्रास आवाहन करायची ताकद अवरते. शब्द एकापुढे एक सहजवेशात सुचत जातात.मनातली उचंबळून येणारी भावना समर्पक अशा शब्दांना आपोआप जन्म देते. लयही तीच निर्माण करते, रूपही तीच प्रदान करते त्यातूनच आपण कवी होतो. अडखळणाऱ्या पावलांनी चालता-चालता त्या महान कवींच्या वाटेवरती पाऊल ठेवत स्वत:ला आनंद देत, जगाला आनंदी करत कवितेच्या गावात पूर्णपणे बुडून जातो.

काही माणसे कवींना प्रयोजन काय असा सवाल करतात. त्यांचे उत्तर गाण्याने श्रम हलके वाटतात. गाण्याने श्रमिकांच्या कष्टांचा परिहार होतो. सामान्याला न उमगणारे कवितेचे सौंदर्य कवींच्या शब्दाशब्दांतून जाणवते. याचे वर्णन करताना केशवसुत म्हणतात,

*'पाणिस्पर्शच अमुचा शकतसे वस्तूंप्रती*
*द्यावया सौंदर्यातिशया,*
*अशी वसतसे जादू करामाजि या'*

मानवी जीवनात काव्याला अनन्यसाधारण स्थान आहे. भावनांना अविष्कार प्रगट करण्यासाठी परमेश्वराचे गुणगान यासाठी काव्य हे उत्तम माध्यम होय. आपल्या जीवनात कवितेमुळेच आनंद निर्माण होतो. काव्यातून आपल्या जीवनातील नीरसरता कमी होते. सौंदर्य, कोमलता, भव्यता या सर्व गोष्टी प्राप्त होतात. खरोखर 'काव्यासारखी कला साऱ्या जगतामधि नाही' कवितेबद्दल एवढेच म्हणावसं वाटतं की,

*'साऱ्या आयुष्याचे रूप*
*एका रचनेत आहे,*
*गर्भ सुखाचा दु:खाचा*
*डोळा काव्यामध्ये आहे'*

म्हणूनच, 'कवितेच्या गावा जावे'

**सविता रमेश घुगरे**

●●●


# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. यशवंतराव सानेंच्या लेखात बीज सूत्राबद्दल अधिक ज्ञान या लेखातून मिळते.*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या मागील अंकात पृथ्वीवरील मानवी समाजात राजकीय बदल घडवून आणण्यासाठी जे प्रयत्न चालू आहेत, त्यावर भारतीय संस्कृतीच्या संदर्भात, काही विवेचन केले.

सध्याच्या 'मानवी मनाच्या संदर्भात - पार्लमेंटरी लॉ व 'कॉस्टिट्यूशन' यांच्या चौकटीत व ह्या क्षणाला जी कुठलीही राजकीय सत्ता 'लोकशाहीच्या' मार्गाने व अधिकाराने बदल घडवून आणू इच्छिते तिला व तिच्या मार्गाला बहुजन समाजाचा, एकमताने नव्हे पण बहुमताने पाठिंबा आहे, हे उघड सत्य आहे !!




The whole unified vision of the universe

ही पद्धती ब्रिटीश पार्लमेंटरी पद्धत वेस्ट मिनिस्टर (इंग्लंड) ह्यावर आधारलेली आहे. पण, ह्यावर जे अनेक मतभेद आहेत. त्यांची चर्चा वर्तमानपत्रे, मिडीया व निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या आपआपल्या 'आयडिऑलॉजी' प्रमाणे म्हणजे राजकीय वा सामाजिक आदर्शवादी तत्वज्ञानाबर हूकूम चालू आहे.

**भारतीय सांस्कृतिक वारसा विस्मृतीत :**

पण, त्या पद्धतीच्या चर्चेपेक्षा सुद्धा भारतीय संस्कृती व तिचे लुप्त झालेले ज्ञान व आदर्श ह्यावर आधारलेली चर्चा, कुठेही दृष्टोत्पत्तीस येत नाही.

कारण, उघड आहे की हे आदर्श व ज्ञान कोणते ह्याची जाणीव पूर्णपणे नष्ट झाली आहे. जिथे ही चर्चा पुसटशी दिसते, तिचा मागोवा घेतला तर ते 'चित्र' एक **'छाया स्मृतीच्या''** दर्जाचे आहे, असे लक्षात येते.

**सनातन धर्म व दैशिक शास्त्र :**

आपण, जे ज्ञान वा आदर्श अभिप्रेत धरतो ते वैश्विक सत्य व गहन चिरंतन स्वरूपाचे, असे मानतो; म्हणजेच सनातन धर्म, वेद व उपनिषद, पुरुषयुक्त, दैविक शास्त्र यांवर आधारलेले व त्यांचे या युगांत केलेले 'एकात्म मानव दर्शन' (पंडीत देवीदयाल उपाध्याय) या संदर्भातील गवसलेल्या 'दर्शनाकरिता' होय!!

मग प्रश्न उभा राहतो कीं ह्या जड व गहन संदर्भातील चर्चेमध्ये कोणत्या त्रुटी आढळतात, किंवा सध्याच्या मानवी मनाला कुठल्या अडचणी भासतात ?

**मानवी देहरूपी अस्तित्वाची पातळी :**

प्रश्न कुटील, गहन व गूढ स्वरुपाचा आहे कारण, ह्या प्रश्नाच्या आवाक्याचा विचार केला तर, सध्याच्या

मानवी ज्ञानाच्या (Consciousness) चैतन्य शक्तीच्या स्तराचा, पातळीचा व गुणवत्तेचा आधार वा मूल्यमापनाचा शोध घ्यायला लागेल. ही पातळी पूर्णपणे इहवादी, भोगवादी आहे. तिला 'आधुनिक विज्ञानाचा अहंकार व आंधळेपण लाभले आहे. आणखी एक छुपी अडचण आहे.

**राजकीय खेळीचे द्यूत व शकुनी फांसे :**

ती म्हणजे राजसत्ता किंवा आर्थिक सत्तेवर आरूढ असलेले सत्ताधारी हे शकुनीमामा सारखे द्वापारयुगातील **'द्युतामधील फासे व पट'** घेऊन युधिष्ठिर व पांडव यांच्या 'भोळसट धर्म धारणेचा' फायदा घेऊन 'राजकारण' करत आहेत. त्यांना, म्हणजे पांडवांना, भगवान श्रीकृष्ण ह्यांच्या 'भगवद्गीतेच्या चतुर ज्ञान व शाश्वत 'विश्वदर्शनाचा' आधार लाभलेला दिसत नाही!! तसेच, त्यातील 'अर्जुन' वा कठोनिषदातील 'नचितेक' ह्यासारखे शुद्ध ज्ञानाची, खरी तृष्णा असलेले विद्यार्थी वा साधक मिळतच नाहीत. **ह्या द्यूताची चौकट भारताची राज्यघटना व फांसे इलेक्शन यंत्रणा आहे!!**

मग हा प्रश्न वा तिढा कसा सुटणार?

**स्वत:चे, व्यक्तीचे आत्मपरीक्षण :**


ह्या प्रश्नाचा तिढा सोडवण्याकरिता, माझ्या मताने, प्रथमच प्रत्येक माणसाने स्वत:चे 'आत्मनिरीक्षण' करणे जरुर आहे.

पहिली गोष्ट म्हणजे, माणूस जन्म झाल्याबरोबर स्वत:चे जीवन जगण्याकरिता लागणाऱ्या सामग्रीचा, ज्ञानाची, आधाराची प्राप्ति होण्याकरिता धडपड करू लागतो. त्यानंतर, समाज त्याचा ताबा घेते, व समाजाच्या प्रचालित व्यक्ती, देश, संस्कृती वर आधारलेल्या विशिष्ट चौकटीवर आधारलेल्या हक्कांच्या 'अधिकार कक्षेतच' त्याचे जीवन अधिकार बांधून टाकते !!

त्यामुळे, ह्या नियंत्रित व बद्ध जीवन व्यवस्थेचा चौकटीतच त्याचे जीवन निर्बंधित होत रहाते. त्याचे आत्मस्वातंत्र्य व्यक्त होत नाही, त्याची मुक्त व खरी जाणीव कदाचित त्याला त्याचया मृत्यूपर्यंत (देह मृत्यू) सुद्धा होते की नाही, ही शंका आहे.


**मानव निर्मित व निसर्ग निर्मित व्यवस्था :**

पण, मुख्य प्रश्न आहे की 'मानवनिर्मित' किंवा 'सृष्टीनिर्मित' किंवा मान्य असल्यास (ईश्वर, परमेश्वर) ब्रह्मे निर्मित अशा मानवी अस्तित्वाचे भान त्याला कधी, किती व स्पष्टपणे जाणवते? आणि, मुख्य म्हणजे हे ज्ञान सत्य आहे की कुठल्यातरी धर्म, संप्रदाय, विज्ञान, तत्त्वज्ञान ह्यांच्या 'कथित' आधारावर अवलंबून असते?



हे परीक्षण अत्यंत आवश्यक आहे - असायलाच हवे! पण, हे करण्याकरिता त्याला मानवी जीवनाच्या पृथ्वीवरील मानवी संस्कृतीचा व त्यातील मिळवलेल्या संग्रहीत ज्ञानाचा अभ्यास करावा लागतो. त्याच्या आत्मस्वातंत्र्याची व्याप्ती जाणावी लागते. हा प्रयत्न ऋषी, संत, ज्ञानी, व सिद्ध पुरुषाच्या जन्मानंतरच्या व्यक्तिगत अभ्यासक्रमावरून दिसून येतो.

ह्याचाच महत्त्वाचा अर्थ हा आहे की 'मानवी संस्कृतींचा इतिहास' हा एक अत्यंत 'महत्त्वाचा ठेवा' आहे. पण, तो ठेवा संभाळण्याकरिता मर्त्य मानवी समाजाला एखाद्या 'रिले रेस' सारखे ते 'ज्ञानाचे गाठोडे' 'Baton' (बॅटन) एका पिढीकडून दुसऱ्यापिढीकडे संक्रमण करावे लागते. ते ज्ञानाचा स्वीकार होण्याकरिता 'overlapping' परस्पर व्यापी पद्धती सारख्या अनेक संस्था, संप्रदाय, राजसत्ता ह्यांच्यामार्फत होणार, त्या जिवंत व जागृत असावयाला हव्यात!!




Picture No 3

ह्या ''**मानवी ज्ञानाच्या जिवंत संक्रमणाची व्यवस्था**'', पुष्कळच गुंतागुतीची व गूढ अण्याची शक्यता उघडच जाणवू शकेल!! त्यांतील संकल्पना, साधने, भाषा व ज्ञानसंक्रमणाची साधने, उपकरणे, ही देखील जपायला हवीत हे उघड आहे.

अशी 'आदर्श व्यवस्था' फक्त भारतात वेदिक काळापासून अस्तित्वात आहे, हे भारताचे शत्रूही मान्य करतील.

पण, ह्या खेरीज ह्या संक्रमणाला निसर्गाचे किंवा परमेश्वराचे सहाय्य आवश्यक आहे, हे हा मानवी समाज पूर्णपणे जाणू इच्छित नाही. मानवी शरीर व निसर्ग व जग ह्यांचे सहाय्य व त्यांच्या चैतन्याच्या 'इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती यांच्या अस्तित्वाची 'गॅरेंटी' शाश्वती कोणती 'सत्ता' देऊ शकते एक त्या ईश्वरीशक्ती खेरीज? या यंत्रणा व संस्था मोडकळीस आल्या आहेत!!

**आधुनिक भौतिक विज्ञानसत्तेचा अंमल :**

आणि, म्हणूनच 'आधुनिक सेक्यूलर विज्ञान ज्ञानाचा' जो अहंकारी आकार व आक्रमक स्वरूप आहे ते अपूर्ण ज्ञानी व चुकीचे आहे हे जाणवेल. मानवी प्रयत्न व ईश्वरी निसर्ग शक्ती यांचा जोड संबंध ह्या कार्याला आवश्यक आहे, त्यावाचून हा 'विश्वनाथाचा रथ' चालणारच नाही. योग्य मानवहितासाठी चालणार नाही.

**वैयक्तिक आत्मपरीक्षण :**

पण, पुन्हा आपण वैयक्तिक आत्मपरीक्षणावर येऊ. ह्या नवीन जन्माला आलेल्या जीवात्म्याची स्वत:बद्दलच्या ज्ञानाची जबाबदारी कोण उचलतो?

**काही बीजात्मक प्रश्न :**

**'मी कोण आहे? माझा जन्म का झाला, कसा झाला? मला लिंगभेद कोणता प्राप्त झाला व त्याचे प्रयोजन काय? मला लौंगिक आकर्षण का असावे? मला जे अन्न व प्राणशक्ती लागते त्याचा पुरवठा व सातत्य कोण संभाळतो? त्या अन्न व प्राणाची योग्य व्यवस्था व उपयोग माझे शरीर इंद्रिये ही कशी व का करतात? ती स्वयंभू व स्वज्ञानी कशी राहतात?**

**मला शरीरवृद्धी का व कशी प्राप्त होते?**
**त्यानंतर वार्धक्य व मृत्यू का येतो?**

**ह्या प्रश्नांना तडीपार केलेले दिसेल. त्यांची विशेष जातवारी जाणून घ्या!!**

जर मला माझा जन्म व मृत्यू ह्याबद्दलचे ज्ञान नाही तर ते मी कसे मिळवायला हवे?

**भौतिकवादी समाजाची पलायनवादी वृत्ती :**

की, ह्या प्रश्नांची मला काही जरुरी वा आवश्यकता वाटत नाही कारण सुखोपभोग घेणे हे जसे प्राण्याला सहज जमते तसेच मलाही जमते मग काय गरज आहे, ह्या प्रश्नांच्या उगमाची व त्यांच्या उत्तरांची?

मला कल्पना आहे की हे प्रश्न वरवर पाहता अत्यंत सामान्य बुद्धीचे वाटतील! दुर्बोध नाहीत पण मानवी अजेंडावर नाहीत!!

**सर्वच ज्ञानी व्यक्तीचा संप्रदायाचा शोध :**

मग, माझा सवाल आहे की त्यांची उत्तरे द्यावी, किंवा, या बद्दलचा पूर्ण ज्ञानाचा एखादा तत्वज्ञानी, वैज्ञानिक असा मानव, संप्रदाय वा 'अधिकारी' उभा करावा!!

**अनुत्तरीत प्रश्न :**

**सत्य गोष्ट आहे की ह्या प्रश्नांची पूर्ण उत्तरे अजूनही मानवी संस्कृतीला मिळाली नाहीत.**

**ही जबाबदारी कुणाची?**

आश्चर्य आहे की कुठल्याही युगात हे प्रश्न फक्त १०%-२०% समाजानेच हाताळले पण, बाकीचा समाज ह्या प्रश्नांकडे असहानुभूतीने, अज्ञानाने किंवा कदाचित तिरस्कारानेच बघत आला आहे. म्हणूनच त्याने **Escapist Route म्हणजे भौतिकवादी - पलायनवाद स्वीकारला!!**

मी **भौतिकवादी** हा शब्द का आणला? कारण, ह्याविरुद्ध वर्तन 'अध्यात्मवादी' किंवा 'Spiritnalist' हे दर्शवित आहेत.

**अपौरुषेय ज्ञान :**


त्यांनी मानवी पुराण संस्कृतीतील ज्ञानाची महत्ता जाणली. विशेष उल्लेख करावयाचा, तो 'अपौरुषेय' 'वेदांचा' हे ज्ञान 'हिंदूचे' आहे असे म्हणून त्याचा दुःश्वास पाश्चात्य संस्कृती व धर्मांनी व राजसत्तेने केला. काही अपवाद आहेत पण विरळाच!!

गंमत ही की भारतातही ह्या 'वेदिक ज्ञानाबद्दल' खुद्द हिंदूना सुद्धा अजिबात ज्ञान उत्सुकता व जबाबदारी व पूर्ण ज्ञानाची लालसा नाही. उलट, त्याला **पुराणमतवादी'** म्हणून हिणवण्यात धन्यता मानली जाते!!

वेदांच्या '**अपौरुषेय ज्ञानाबद्दल**' वैज्ञानिक तर्कशास्त्राच्या जोरावर शंका पसरवण्यात धन्यता मानणारा वर्गही जोरात आहे!!

**कां बरे ही अवस्था? कारण, हा एक, अश्रद्ध व अहंकारी व विशेषत: 'भौतिकवादी विज्ञानवादाचा छुपा अहंकार, किंवा 'साधा मत्सरही', असू शकतो!!**

**महायोगी अरविंद** यांच्या **'Secrets in Vedas'** ह्या पुस्तकाचे अध्ययन केल्यास त्याचा शोध लागेल. काय आहेत त्यांचे निष्कर्ष व परीक्षण?



१) महायोगी अरविंदानी, प्रथम स्वामी दयानंद (आर्यसमाजाचे मूळ संस्थापक), ह्यांच्या वेदीक संहितेतील दिव्य पण गूढ व आगम ज्ञानातील बहूमूल्य संशोधनाचा, विश्वासाचा व जाणीवेचा मुक्त कंठाने आदर व प्रसार केला. त्यांचे 'Baukim, Dayanand and Tilak'



हे पुस्तक जरुर वाचावे. त्याचा उल्लेख मी 'दिशाच्या' माझ्या अनेक लेखांत वारंवार केला आहे. त्याची गंभीर दखल कोणीही घेतली असे मला दिसले नाही. हा सुद्धा एक अहंकाराचा किंवा पूर्वग्रहाचा प्रभाव असावा!!

**Go back to Vedas :**

स्वामी दयानंद यांची जोरदार घोषणा होती कीं ***"Go back to Vedas"***



ह्याचे उघड कारण हे की वेदांवरील भाष्य, आचार व कर्मकांड यांच्या गदारोळात खरे ज्ञान – जे आध्यात्मिक स्पिरीच्युअल आहे, त्याच्या ऐवजी मतमतांचा गोंधळ व शुष्क कर्मकांडी ज्ञानच हाती सापडत होते.

तेव्हा, हा सुमारे २०० वर्षापूर्वी आग्रह धरण्यात आला, त्याचे उघड कारण हे की शुद्ध ज्ञान हे वेदांचे खरे 'आध्यात्मिक अर्थ' जोरदारपणे, सकसपणे, उच्च प्रज्ञेने लावणे आवश्यक आहे कारण ते 'ईश्वरी ज्ञान' आहे. ह्याची जाणीव मुख्यत्वे स्वामी दयानंद व अरविंद यांना झाली.

जसे एखाद्या **Computer** चे **Manual** हे त्याचे ज्ञान त्याची खरी शक्ती प्रत्यय व ज्ञान प्रत्ययासी होण्यासाठी त्याच्या **'मॅन्यूलवर'** विश्वास ठेवायचा कां **त्या कॉम्प्यूटरच्या मालकाच्या बुद्धीवर व वापरावर विश्वास ठेवावयाचा?** त्यामुळे, मानवी बुद्धीच्या तर्कपद्धतीवर पूर्ण विश्वास टाकणे हे जरी आवश्यक असले, (एका बाजूने) तरी त्याचा खरा बोध मानवाला प्राप्त झाला आहे.

त्यामुळेच मानवी तत्वज्ञानात जी ६ दर्शने निर्माण झाली – चार्वाक, सांख्य, न्याय, वैशेणिक बौद्ध अद्वैत वगैरे, त्याच्या ज्ञानाच्या वेदांताबद्दल म्हणजे वेद (ज्ञान त्याचा हत ही साशंक व जागृत रहाणे आवश्यक झाले!!

**मूळ बीज कल्पना :**

त्यातील मूळ कल्पना **मानवी रूप 'Human form'** बद्दल जी आहे, ती म्हणजे हा जीव 'शरीरबद्ध आत्मा' होय. त्याला शरीर हे प्रकृतिकडून ह्या पृथ्वीवर प्राप्त होते, पण त्याचे वैश्विक अस्तित्व हे सामान्यपणे त्याच्या 'आत्मस्वरुपाचे आहे. ह्या 'जीवात्म्याचा' प्रवास हा जन्म, मृत्यू ह्या वैश्विक चक्रावर आधारलेला असून त्याच्या आत्म्याच्या गुणात्मक उद्धारासाठी त्याचा ह्या पृथ्वीवर, त्याच्या स्वत:च्या शरीर व इंद्रियांमार्फत किंवा त्याला दिलेल्या 'श्रीयंत्र' ह्या साधनेने, वा सत्य संस्कारानी, वा इतर यंत्रणेच्या मदतीने होत असतो. ह्या उद्धारासाठी ह्या पृथ्वीवर निसर्ग, वनस्पती, प्राणी जीवन, वैश्विक ग्रह, तारे व प्रत्यक्ष मानवी समाज – समाविष्ट ह्या सुद्धा या खेळांत सामील असतात. ह्याचा अर्थ त्या प्रत्येकाचा भाग हा परस्पर उन्नती व त्यांच्याही स्वत:च्या उन्नतीसाठी असतो. **हा एक गूढ परस्पर अवलंबी खेळ आहे!!**

**<u>ह्या खेळाची पूर्ण जाणीव फक्त वेदिक संस्कृतीनेच करून दिली आहे. भौतिक प्रगती हा देखील त्या खेळातीलच एक 'अविभाज्य भाग' आहे.</u>** मुडक उपनिषद वा इगोवास्थ उपनिषद हे विशद केलेले आहे.

**आत्मज्ञान व आत्मबोध :**

**पण, ह्या खेळात सामील होणारा माणूस 'आत्मज्ञानावाचून' अज्ञानी आहे. त्याला ह्या ज्ञानाची आवश्यकता पटवून देणे ही समाजाची जबाबदारी आहे.**

त्याचबरोबर हे ज्ञान, जाणीव व त्यानंतरची उलगडणारी 'आत्मउद्धाराची' 'समाज उद्धाराची' जबाबदारी करून घेणे, ही त्यांची कर्तव्ये आहेत.

ही 'कर्तव्ये' झिडकारुन देणारा 'जीवात्मा' हा त्याला मिळणाऱ्या 'सुवर्णसंघाबद्दल' अज्ञानी आहे, असेच म्हणावे लागेल!! कारण, ही संधी प्रत्यक्ष 'देवं,' 'दानव', 'यक्ष', किन्नरं ह्या सोनीतील आत्मे, तसेच जड वस्तू, वनस्पती व प्राणी ह्यातील जीवात्म्यांना मिळावी, ही त्यांची देखील सूप्त व अव्यक्त इच्छा आहे.

ही **'सुप्त इच्छा'** म्हणजे **'Aspiraton' अभिसा ही प्रत्येक मानवी अस्तित्वाला आहे – दुर्योधनाला व कंसालाही** फक्त त्यांना त्याची जाणीव वा तयारी नाही. हे त्यांचे खरोखर अज्ञान आहे.!!

**त्यामुळेच एक वचन आहे**

**Who would know his own Ignorance?**

स्वत:ची स्वत:च्या अज्ञान प्रांताची जाणीव होते हे दुर्लभ आहेच, पण ही जाणीव होणे हा सुवर्ण योग मानावा लागेल.

तेव्हां ही जाणीव होणे व त्यावर हूकूम प्रयत्न करणे हे मानवी व्यक्तिगत व सामाजिक कर्तव्य आहे.

ह्या प्रयत्नाच्या रोखाने मानवी इतिहासात कोणती साधने शोधण्यात आली, कोणत्या सुप्त शक्तींचे अस्तित्व मानवाने जाणले ह्याचा रोचक व दिव्य इतिहास खरोखरच जाणणे अत्यंत महत्वाचे आहे.

पण, ह्या अंकात एवढेच!! दिशाच्या पुढील अंकात आपण ह्या सर्वांचा सूत्र पद्धतीने जरुर शोध घेऊ.

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

## दिशासाठी काही विषय

**ऊर्जा – पुनर्नवीकरण**

**अर्थशास्त्राचे बदलते आयाम**

**इतिहास का, कसा?**

**मी वाचलेलं एक पुस्तक**

**पर्यावरणाचे आवरण**

# २१ व्या शतकातही श्री अरविंद विचारांची समर्पकता

*तत्त्वज्ञानातील चिरंतन विषय व श्री अरविंदाचे विचार याबद्दल विचार मंथन करणारा लेख - संपादक*

तर्कशास्त्रावर आधारित वैचारिकता, व्यावसायिक दृष्टिकोन ठेवणारा आणि शास्त्र व तंत्रज्ञान यांच्या विकसित भरभक्कम पायावर उभा असलेला आधुनिक समाज, सामाजिक कार्य समजू शकतो, परोपकार समजू शकतो, त्याला भूतदयाही समजते पण हा आधुनिक समाज अध्यात्मिकता म्हणजे काय ते समजू शकत नाही. जेथे अध्यात्म म्हणजे काय ते ठाऊक नाही, आध्यात्मिक व्यक्तींना ओळखू शकत नाही तेथे आध्यात्मिक क्रांती कशी समजणार? स्वत: श्री अरविंदांनीही एका ठिकाणी म्हंटलय की इतिहासात होऊन गेलेल्या आध्यात्मिक क्रांतिकारकांची हा समाज पूजा करतो, त्यांना देव मानतो पण वर्तमानातील आध्यात्मिक क्रांतिकारकांना मात्र ओळखू शकत नाही, त्यांचे द्रष्टे विचार त्याला पचत नाहीत जेव्हा तो थोडा फार प्रयत्न करतो तेव्हाही तो बाह्य रंग-रूपाला भुलतो. एखादा माणूस योगी झाला म्हणजे त्याने सामान्य जीवनापासून फारकत घेतली अशी त्याची पारंपरिक समजूत असते.

श्री अरविंदानी जीवनाच्या सर्व विषयांना स्पर्श केला आहे, असं जर त्याला सांगितलं तर तो चकित होतो, विचारात पडतो आणि म्हणून अशा या समाजाला पडणाऱ्या प्रश्नावर जे विचार श्री अरविंदानी व्यक्त केले आहेत आणि तेही १०० वर्षापूर्वी ते आज त्यांना कालानुरूप समर्पक वाटतील का?

या प्रश्नाचं उत्तर ''निश्चितच वाटतील'' असं आहे त्याचं मुख्य कारण म्हणजे जीवनाच्या सर्व प्रश्नांना श्री अरविंदानी दिलेली उत्तरं ही शास्त्रशुद्ध दृष्टिकोनातून आणि तर्कशुद्ध पद्धतीने दिलेली आहेत. ते पहिलेच असे आधुनिक महायोगी, महर्षी आहेत की ज्यांनी मानवी समाजाच्या प्रगतिपथावर आधिभौतिकवाद आणि बुद्धिप्रामाण्यवाद हे आवश्यक टप्पे आहेत असे मानले आहे. तसेच व्यक्त जगातील अथवा अव्यक्त जगातील जीवनविषयी सर्वांगीण दृष्टिकोन स्वीकारतानाही त्यांची आवश्यकता नाकारलेली नाही. श्री अरविंदाचे विचार असे आहेत की ज्यामुळे व्यक्तिमात्राची समाजाशी एकता निर्माण होईल, सामंजस्य निर्माण होईल शिवाय शारीरिक जीवन, प्राणिक जीवन, भावनात्मकता, मानसिकता आणि आत्म्याची हाक या सर्वांशी जुळवून घेणे सहज शक्य होईल. वेद, उपनिषद, आणि भगवद्गीता यांतील विचारधारा आणि आधुनिकांना समजणारा उत्क्रांतीवाद यांची सांगड घालून एक नवविचार नव्या अविष्कारात आणि शास्त्रशुद्ध भाषेत त्यांनी समाजासमोर मांडला.

या ठिकाणी असा प्रश्न निर्माण होतो की हा नवविचार त्यांनी नव्या आविष्कारात का मांडला? श्री अरविंद म्हणतात, की मानवी समाजाची प्रगती ही चक्राकार गतीने परंतु ऊर्ध्व दिशेने होत आहे. म्हणजेच, मानवी समाज हळू हळू उत्कांत होत आहे, जाणीवेच्या वरच्या स्तरावर जात आहे. चिरंतन सत्य हे जरी कालातीत असलं तरी ते काळातून स्वत:ला प्रकट करते. आणि म्हणून प्रत्येक पवित्र शास्त्रात दोन घटक असतात, एक-तात्पुरता विनाशी, आपल्या उद्याच्या काळातील, देशातील प्रचलित कल्पनांनी निर्मिलेला तर दूसरा अविनाशी, सर्वकाळ टिकणारा, सर्व युगात सर्व देशात

कार्यक्षम ठरणारा आणि म्हणून प्रगत पावलेल्या जाणीवेच्या वरच्या स्तरावर जात असलेल्या मानवी समाजासमोर चिरंतन सत्याचा हा कालातील, अविनाशी असणारा घटक जर नव्या अविष्कारांत मांडला तरच तो त्यांना रुचतो पचतो, आणि तो समाज त्याचा स्वीकार करतो. प्रकृतीच्या नियमांनुसारही प्रत्येक गोष्टीत प्रत्येक प्राणिमात्रात, प्रत्येक मानवात अथवा मानवाने निर्माण केलेल्या केलेल्या विचारांत कालानुरुप बदल होण्याची गरज असते. जे बदलाचा स्वीकार करत नाहीत ते कालौघात हळूहळू नष्ट होतात.

विज्ञान आणि अध्यात्मिकता यामध्ये पूर्ण सामंजस्य निर्माण व्हावे अशा पद्धतीने श्री अरविंदानी आपल्या विचारांचा पाया घातला आहे. विज्ञानाच्या मर्यादा आणि विज्ञानाच्या दिशाहीन घोडदौडीमुळे मानवाच्या समस्यांमध्ये पडलेली भर याबद्दल जरी त्यांनी नाराजी व्यक्त केली असली तरी समाजाच्या प्रगतीस विज्ञानाची झालेली मदत पाहून त्यांनी विज्ञानाचे मुक्तपणे कौतुकही कसे केले आहे ते पुढील उक्तीवरून स्पष्ट होईल - "Science has already enlarged the intellectual horizons of the race and raised, sharpened and intensified powerfully the general intellectual capacity of mankind" आधुनिक विज्ञान ही मूलत: ज्ञानाचीच एक शाखा आहे असे प्रतिपादन करून ते म्हणतात की विज्ञानाने आजपर्यंत जरी भौतिकावर विजय मिळवण्यात समाधान मानले असले तरी पुढील झेप घेण्यापूर्वी त्यादृष्टीने समर्थ होण्याचीही आवश्यकता होती.

श्री अरविंदाचा योग जीवनाभिमुख आणि जीवनस्पर्शी असा आहे. भौतिक जीवनाकडे पाठ फिरवून वैयक्तिक मोक्षप्राप्तीसाठी सर्वसंगपरित्याग करण्याच्या संन्यासी वृत्तीचा त्यांनी धिक्कार केला आहे. ते म्हणतात, "We have seen the result of the agelong pressure of the buddhism and its successor illusionism No society dominated by such denial of life - dynamism can flourish, Far from dynamic it becomes static and from that static position it proceeds to stagnation and degeneration" बुद्ध काळापासून ही प्रवृत्ती आपल्या देशात वाढीस लागली अत्यंत हुशार आणि बुद्धिमान माणसं, अनेक शूर वीर, अनेक थोर कलावंत जीवनाकडे पाठ फिरवून वैयक्तिक मुक्तीसाठी हिमालयात गेले. त्यांना मोक्ष मिळालाही असेल, पण अशा थोर व्यक्तींनी लाथाडलेला समाज हळू हळू खोल गर्तेत ढकलला गेला आधिभौतिक जीवनाला तुच्छ मानल्यामुळे आपल्या देशाला फार मोठी किंमत मोजावी लागली आणि म्हणून आधिभौतिक जीवनाला प्राचीन काळी असणारं वैभव प्राप्त करून देण्याची गरज आहे.

यतिवादातील आत्यंतिकता आणि कर्मठ धर्मनिष्ठा यामुळे जीवनातील आनंद आणि सौंदर्य नाहीसे होऊन जीवन कुरूप होते नीरस होते या प्रवृत्तीचा धिक्कार करून ते म्हणतात की परमेश्वर हा जसा पवित्र्यमूर्ती आहे तसाच तो प्रेममूर्ती आहे आणि सौन्दर्यमूर्तीही आहे हे या मंडळींना समजले नाही. " To find highest beauty is to find God, to reveal, to embody, to create as we say, highest beauty is to bring out of our souls the living image and power of God" आपलं वैयक्तिक जीवन अथवा सामाजिक जीवन पूर्णत्वाला न्यायच असेल तर जीवनातील सौंदर्य नाकारता येणार नाही असे प्रतिपादन करून ते म्हणतात...

" A complete and universal appreciation of beauty and the making entirely beautiful our whole life and being must surely be a necessary character of the perfect individual and the perfect society."

आजची समाजव्यवस्था अर्थप्रधान आहे आणि आजच्या मानवाला आजच्या जीवनशैलीसाठी पुरेशा

अर्थप्राप्तीवाचून पर्याय नाही. वस्तुत: धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ मानणाऱ्या आमच्या संस्कृतीने 'अर्थ' कधीही नाकारलेला नव्हता. त्याला धर्माचे अधिष्ठान असावे, तो अधर्माने प्राप्त करू नये एव्हढाच संस्कृतीचा आग्रह होता परंतु गेल्या १००० वर्षात संन्यासवाद आणि निवृतीपर तत्त्वज्ञानातील काही विचारधारांनी तयाला विषवत मानलं.

या पार्श्वभूमीवर श्रीअरविंद एक वेगळाच विचार मांडतात "All wealth belongs to the Divine and those who hold it are trustees and not possessors." पुढे ते म्हणतात की सात्विक प्रवृत्तीच्या लोकांनी संपत्तीकडे पाठ फिरवल्यामुळे असुरांनी तिचा कब्जा घेतला आणि तिचा वापर स्वार्थासाठी, समाजविघातक कार्यासाठी ते करू लागले. सात्विकांनी त्यांच्याशी लढून ती संपत्ती पुन्हा प्राप्त करावी तिचा उपयोग दैवी कार्यासाठी करावा. यावरून एक गोष्ट आठवली...

पाँडिचेरी आश्रमातील साधकांना त्यांच्या दैनंदिन गरजा ज्या खात्यामार्फत पुरवल्या जातात त्या खात्याला माताजींना 'समृद्धी (प्रोस्पेरीटी)' असे नाव दिले होते ते पाहून थोर वैदिक पंडित श्री सातवळेकर शास्त्री म्हणाले ''येथे खरी अध्यात्मिकता आहे. वेदांमध्ये संन्यासमार्गाचा कोठेही उपदेश केलेला नाही. पार्थिव जीवनावर, समृद्धीवर बहिष्कार किंवा जगाकडे पाठ फिरवून परलोकाचे चिंतन ही वैदिक शिकवण नाही. माताजी तुम्हांला समृद्धीचा उपदेश देत आहेत रुक्ष जीवनाचा नाही. जिते जागते वैदिक युग इथे जन्म घेत आहे.''

पंडित सातवळेकर शास्त्रींनी समृद्धी या नावावरून जरी हे मत व्यक्त केलं असलं तरी श्रीअरविंद व माताजींचा यांबाबतचा दृष्टिकोन समजून घेणं आवश्यक आहे. आधुनिक काळाला अनुसरून अनेक सुविधांचा वापर अनिवार्य ठरतो. मात्र असा वापर करताना साधकाचं मन त्यांत गुंतून राहता नये. अशा सुविधांवर अवलंबून राहून साधकाने त्यांचा गुलाम होऊ नये. या सुविधा जर कांही कारणांमुळे उपलब्ध नसतील तर त्यासाठी त्याचा जीव तुटू नये. जगापासून दूर कुठेतरी एकांतवासांत स्वत:ला बंदिस्त करुन घेतल्या जाणाऱ्या बाह्य संन्यासापेक्षा अशा प्रकारची आंतरिक संन्यस्तवृत्ती निर्माण व्हायला हवी.

यानंतर पुढील मुद्दा म्हणजे शिक्षणपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे असे ते मानतात. योग्य शिक्षण दिल्याशिवाय चांगली मानवता निर्माण होणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. या शिक्षणात अध्यात्मिकतेचा (धार्मिकतेचा नव्हे किंवा नैतिकतेचाही नव्हे) ठसा उमटणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते सुसंवाद, प्रेम आणि एकता या चिरंतर गुणांवर शिक्षण पद्धती आधारित असावी. डॉक्टर स्टीफन व्हाइट हा अमेरिकेतील एक शिक्षण तज्ज्ञ म्हणतो की जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे सारं जग जवळ आलं आहे. अशा परिस्थितीत जागतिक एकतेसाठी राष्ट्रवादाच्या जोडीने जागतिक नागरिकत्वाची संकल्पना शिक्षणातून देणं हे शिक्षणतज्ञांपुढील फार मोठे आव्हान आहे त्या दृष्टिकोनातून श्री अरविंदांची विचारधारणा आणि त्यांचे शिक्षणावरील विचार हे महत्त्वपूर्ण ठरतात. डॉक्टर व्हाइट काय म्हणतात ते त्यांच्या शब्दात पाहू.

"20th century saw the birth of a new social phenomenon termed 'globalization.' The world is evolving into an interconnected social system producing a corresponding higher level of collective consciousness on a planetary scale. Therefore humankind now has a communal responsibility to fascilitate evolutionary movement towards global social integration, the construction of a new social reality and to cultivate planetary collective consciousness.

The involution of the divine spirit into individual consciousness is driving societies towards increasingly complex and advanced

levels of collective consciousness. Global societies will continue to evolve towards greater interaction and convergence constructing ever higher degrees of collective consciousness and social globalization. The most significant educational value of Aurobindonian thought is the idea that humankind must become educated of the possibility of genuine global cooperation

२० व्या शतकाच्या अखेरीस माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस फार मोठी चालना मिळाली. आणि त्यामुळेच ज्ञानाची मक्तेदारी संपुष्टात येऊन ज्ञानाची कवाड सर्वांसाठी खुली झाली जवळ जवळ १०० वर्षापूर्वी या गोष्टीची अपरिहार्यता व्यक्त करताना श्री अरविंद म्हणतात – "the universalisation of knowledge and intellectual activity in the human race is now only a question to time." सुसंस्कृत समाजाने आपल्याकडील ज्ञान आपणापाशीच न ठेवता आपल्या भोवताली असणाऱ्या अज्ञ समाजालाही द्यायला हवे असे मत व्यक्त करून ते म्हणतात की असे जर त्यांनी केले नाही तर त्यांची सुरक्षितता धोक्यात येऊ शकते. इतिहासातील अशा प्रकारच्या अनेक घटना आपणांस ठाऊक आहेत. मात्र आधुनिक समाजाने इतिहासापासून योग्य तो धडा घेतला असल्याने आपणाजवळील ज्ञान इतरांना देण्यास तो आता कटिबद्ध झाला आहे हे लक्षात घेऊन श्री अरविंदानी वरील मत व्यक्त केले.

यानंतर पुढचा मुद्दा येतो तो व्यक्तिस्वातंत्र्याचा. श्री अरविंद तर स्वत:ला Spiritual Anarchist मानत. यांचे मुख्य कारण म्हणजे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत, प्रत्येक पातळीवर आपली प्रगती साधत असताना मानवी आत्म्याला संपूर्ण स्वातंत्र्य हवे असते असे ते मानत. परंतु त्याच बरोबर अशा प्रकारचे स्वातंत्र्य उपभोगत असताना त्यामुळे इतरांच्या स्वातंत्र्याचा संकोच होऊ नये, त्यावर गदा येऊ नये असेही त्यांचे ठाम मत होते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या आधुनिकाना मानवणाऱ्या तत्त्वांवर पाँडिचेरी आश्रमाची वाटचाल झाली आहे. सर्वजण कधीही समान नसतात, समान पातळीवर नसतात, समान कुवतीचे नसतात मात्र अशा सर्वांना आपआपल्या पातळीवर आपापली प्रगती साधण्यासाठी समान संधी मिळायला हवी. पाँडीचेरी आश्रमाच्या सर्व व्यवहारांमध्ये पुरुष व स्त्रिया यांना समानतेने वागविले जाते. मात्र या समानतेचे बीज कशात असेल तर, प्रत्येक व्यक्ती म्हणजे शरीर व मन यांच्या आवरणाखाली असणारा एक आत्मा आहे. या दृष्टीकोनात आहे. पंडित सातवळेकर शास्त्री यांना जेव्हा हा दृष्टिकोन समजला तेव्हा ते म्हणाले, '' माताजी तर येथे शुद्ध आध्यात्मिक समाजाची स्थापना करत आहेत. वेदांप्रमाणे आत्म्याच्या दृष्टीने स्त्री पुरुष असा भेद नाही ज्या देशात स्वयंशक्तीची स्त्री रूपात कल्पना केली गेली त्याच देशात स्त्रीचा सतत अपमान केला गेला, तिला वेदपठणाचाही अधिकार ठेवला नाही स्त्रीची खरी प्रगती मला येथे दिसली वैदिक आदर्श येथे प्रत्यक्षात उतरलेले दिसले.''

आपल्या जीवनमूल्यांची पुन्हा नव्याने उभारणी करून एखादा नवीन विश्वधर्म निर्माण व्हावा आणि त्यायोगे प्रत्येक व्यक्तिमात्राला चिरंतनाशी सुसंवाद करता यावा असे त्यांना वाटे.

काव्यनिर्मितीच्या प्रांगणात भावी काळातील कविता कशी असेल ते दाखवून अलौकिक प्रतिभेच्या सहाय्याने मंत्रसामर्थ्य असणारी काव्यपंक्ति कशी निर्माण होते त्याचे त्यांनी दर्शन घडविले.

समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून प्राचीन काळापासून मानवतेची वाटचाल कशी झाली त्याचा त्यांनी शास्त्रशुद्ध असा आढावा घेतला आहे त्यांतील विविध टप्प्यांना symbolic, typal, conventional, individualistic, and subjective period अशी नावे दिली आहेत. त्यातील प्रत्येक टप्प्याची वैशिष्ट्ये सांगून पुढील टप्प्यात मानवता

का व कशी संक्रमित होते त्याचे त्यांनी शास्त्रशुद्ध विवेचन केले आहे, त्यांतील पहिले दोन टप्पे जरी भूतकाळात जमा झाले असले तरी तिसरा टप्पा अजूनही आपले अस्तित्व टिकवून आहे चौथ्या टप्प्याचा प्रभाव वाढतो आहे. आणि पाचवा टप्पा अधून मधून तुरळक डोकावू लागला आहे आणि त्यामुळेच मानवता आता सैरभर झाली आहे, सत्याच्या शोधार्थ ती तळमळू लागली आहे. यातूनच ती अध्यात्मिकतेकडे संक्रमित होईल आणि मगच तिला सत्य सापडेल. हे सारं जरी स्वप्नवत वाटलं तरी त्यांचं शास्त्रशुद्ध तार्किक विवेचन विचारी मनाला पटणार आहे.

राजकीय पातळीवर १०० वर्षापूर्वी त्यांनी असं स्पष्ट म्हटलं आहे की जरी राष्ट्राराष्ट्रामध्ये झगडे चालूच असले, युद्ध होत असली तरी आपण मानवतेच्या संपूर्ण ऐक्याच्या दिशेने वाटचाल सुरू केला आहे यात संशय नाही. १०० वर्षापूर्वी त्यांनी जागतिक दृष्टिकोनाचा आणि जागतिक जाणीवेचा विचार केला होता आणि म्हणूनच डॉक्टर स्टीफन व्हाइट त्यांच्या लेखाची अखेर करताना म्हणतो – "Aurobindonian thought is an educational motif of globalization that promotes a sense of Ultimacy giving rise to civil future of world unity."

या सर्व विचारांचा आणि त्यावर झालेल्या विविध भाष्याचा विचार केला तर आपल्या ध्यानात येईल की जग कितीही पुढे गेलं असलं तरी १०० वर्षापूर्वी श्री अरविंदांनी जीवनाच्या सर्व बाजूंवर व्यक्त केलेले विचार आजही समर्पक आहेत, यापुढेही ते समर्पक राहतील आणि त्यांची सत्यता मानवी समाजाला आधिकाधिक पटत जाईल.

**श्री. नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी – २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

## वेळ नाही

अमाप सुख आहे सगळ्यांच्याच पदरात.
पण ते अनुभवायला वेळ नाही.
आईच्या अंगाईची जाणीव आहे
पण आईला आज आई म्हणायला वेळ नाही
सगळ्यांची नावं मोबाईलमध्ये सेव्ह आहेत
पण प्रेमाचे चार शब्द बोलायलाही वेळ नाही
डोळ्यावर आली खूप झोप
पण आज कोणाकडे झोपायलाही वेळ नाही
सांगेल कोण कशाला दुसऱ्याबद्दल
जेव्हा इथे स्वत:कडेच बघायला वेळ नाही
परक्याची जाणीव कशी असेल
जर इथे आपल्याच माणसांसाठी वेळ नाही
अरे जीवना, तूच सांग
जगण्यासाठी चाललेल्या या धावपळीत
जगायलाच आज वेळ का नाही.

# अर्धा राहिलेला संग्रहात कुठेतरी सापडलेला लेख...

*काही वेळा लिहिता लिहिता लेख अर्धवट राहतो. कालांतराने सापडतो. असेच संग्रहातले हे सापडलेले लेखन – संपादक*

खूप खूप वर्षापूर्वी, म्हणजे माणसे घरात रहात होती तेव्हाची गोष्ट आहे, एक छानसं, टुमदार कौलारू घर होतं, मराठीत 'नांदत गोकुळ', असं त्या घरांना म्हणायची पद्धत होती. चुलत मावस नात्यांची वीण आणि त्यात विणल्या गेलेली माणसं एकत्र नांदायची, माणसं म्हटल्यावर मतभेद भांडणं ही आलीच. पण त्या काळात हे मतभेद घरातल्या कर्त्या पुरुषाला मिटवता येणारे असत. व्यक्ती स्वातंत्र्याच्या चुकीच्या कल्पना तेव्हा रूढ नसत. त्यामुळे स्वाभिमानाचा पीळ ही 'घरातल्या' माणसांकरिता तुटेपर्यंत ताणला जात नसे. तर आज कल्पनाच वाटावी अशा त्या घराला अंगण, परसदार असायचं बैठकीची खोली, ओसरी, स्वंयपाक घर, व्हरांडा या सर्व खोल्यांबरोबर त्या काळातल्या घरात कुठीघराची अंधारी खोली, बाळंतीणीची अंधारी खोली या खोल्याही असायच्या. या घरांची मापं कशी असतील देव जाणे. आज दोनशे स्क्वेअर फूट, तीनशे स्क्वेअर फूट, बिल्टअप, सुपर बिल्ट अप वगैरे, आपलेसे न वाटणारे शब्दही आपल्या भाषेला गळवासारखे चिटकलेत. पण त्यावेळी वास्तूची अशी मापं काढणं होतं की नाही, माहीत नाही. तर अशा नात्याच्या गोतावळ्यात एक छोटं मूल वाढत होतं.

दिवस भर घरभर रांगून रांगून, सगळयांच्या अध्यातमध्यात लुडबुड करुन बाळ दमलं होतं. त्या वेळेला 'प्राईम टाईम' नसल्यानं तिन्ही सांजा होत. अशा तिन्ही सांजेच्या वेळेला बाळाची कुरकुर सरू झाली की 'काऊ ये, चिऊ ये' म्हणत कसं बसं मऊ भाताचे घास भरवले जाइ बाळ सस्तावलं दमून दमून, किरकिर करायला लागलं. तेव्हाची बाळं किरकिर करीत. पण कटकट मात्र करीत नसत आताच्या स्क्वेअर फुटांच्या खुराडांमध्ये कटकटच जास्त! तर त्या छोट्या बाळाचं रडं वाढलं तर आईनं त्याला उचललं. फॅरेक्स किंवा तत्सम डब्यात बंद असलेलं भुसायुक्त व्हीटॅमिन युक्त अन्न त्या बाळानं खाल्लं नव्हत. पोट शांत राहील असा मऊ भात, साजूक (म्हणजे काय हा आजच्या मुलांचा प्रश्न) तूप, गोडं वरण, असं खाऊन बाळाला पेंग आली होती. आईनं त्याला उचलून कडेवर घेतल. माय लेकरं परसात उभी राहिली. टी. व्ही. सीरीयल पहायच्या त्या प्राईम टाइम मध्येही आई कुरकुरली नाही. परसातून येणाऱ्या मोठ्या आजोबांनी 'का ग, निजला नाही वाटतं' असं विचारलं तेव्हा फार नाही आठ साडे आठ झाले असतील. पलीकडे पोरसवदा पपई उभी होती. आई बाळाला समजवत होती, ''ओ रे माझ्या राजा, नाही रे माझ्या सोन्या ...'' एकीकडे जोजावत होती, थोपटत होती. पण बाळ आज जरा जास्तच दमला होता. दमणूक फार झाली की मुलं झोपताना किरकिर करतात असं मामंजी म्हणायचे ते काही खोटं नाही असा विचार करीत आई परसात उघडणाऱ्या मागच्या दरवाज्याच्या वरच्या पायरीवर बसली. तिला आकाशात समोर उगवलेलं वाटोळं चंद्राचं बिंब दिसलं. पपईच्या कंगोरे असणाऱ्या पानांच्या आडून आई उभी राहिली. ''बाळा, राजा ते बघितलंस, चांदोबा आलाय...'' असं बाळाला बोबड्या बोलातच तिनं सांगितलं आणि काय आश्चर्य, बाळ रडायचं थांबलं, कुतुहलानं, नवलाईनं, अप्रूपानं, विस्फाराया नेत्रांनी चांदोबा पाहू लागलं. उजव्या हाताचं बोट तोंडात गेलं. डोक्यावरचं टोपडं आईनं सावरलं आणि बाळाला चांदोबा तर

आवडलायं, हे तिनं हेरलं आणि जात्यावर पहाटे सासूबाईंनी शिकवल्यामुळे गायला लागलेली ती माऊली गोड आवाजात गायलाही लागली, 'चांदोबा चांदोबा भागलास का, निंबोणीच्या झाडामागे लपलास का...'' बाळ पहात होतं , ऐकत होतं, मंत्रमुग्ध होत होतं. निंबोणीचं झाडतर अंगणात होतं. इथं आपल्या अशाच पपया, केळी ... पण पपईच्या झाडामागे लपला तरी बाळाला काय फरक पडतोय ... बाळ पेंगुलळं, आईच्या खांद्यावर डोकं टाकून शांतपणे निद्रधीन झालं. बाळाचे बाबा ऑफिसातलं काम करीत बसले होते. आईने शांतपणाने बाळाला गादीवर झोपवले. झोपेचा प्राईम टाईमच होतो तो.

आता बाळाच्या उद्याच्या पहाटेच्या दुधाची तयारी करावी म्हणून आई उठली...

पण चांदोबा मात्र भागूनच गेला

●● ●● ●●

आपल्या ठाण्यातल्याच एका छोट्या ५-६ वर्षांच्या मैत्रिणीस मी सूर्योदयाचा देखावा काढायला सांगितला. चित्रकला तशी आमच्या ही पिढीची पक्कीच! निसर्ग चित्र काढा अशी सूचना सरांनी दिली की आम्ही त्रिकोण त्रिकोण काढून पर्वत काढायचो, दोन त्रिकोणात अर्ध-गोल म्हणजे उगवता सूर्य व त्या अर्धा गोलाच्या वरच्या दिशेने सरकणारे डॅश डॅश डॅश म्हणजे सूर्य किरण वरती निळा वॉश द्यायचा. दोन त्रिकोणांच्या दरम्यान नदी दाखवायची व तिला वॉश दिला की त्यावर काळ्या रंगाने ४४४ असे आकडे (म्हणजे कावळे) काढायचे, झाले निसर्ग चित्र!

एकदा शाळेतल्या अशोक नावाच्या माझ्या मित्रांन दोन त्रिकोणात दोन अर्ध गोल काढले व मधल्या दोन त्रिकोणात काळा रंग भरला. अर्थात चित्रकलेच्या पदवीचे भेंडोळे स्वत:जवळ असल्याने चित्रकला शिक्षक (आजच्या परिभाषेत कला शिक्षक) झालेल्या आमच्या सरांनी त्यांच्या चित्राची खरोखरच चिरफाड केली. अशोक म्हणाला मी एकाच वेळी दोन सूर्य काढलेत कारण मला दोन दिवस दाखवायचेत आणि मध्ये काळा रंग दिल्यावर मी खाली सोमवार मंगळवार लिहिणार होतो ... पण सरांनी ऐकूनच घेतलं नाही (विद्यार्थ्यांनाही बाजू असते, ती आपण ऐकायची असते हे समजले असते तर ते शिक्षक शिक्षक कसे झाले असते!!)

.... तर ठाण्यातल्याच त्या मैत्रिणीचे सांगत होतो, तिनं चित्रांत सगळीकडे चौकोनी ठोकळे काढले, टी. व्ही. चे अँटिना त्या ठोकळ्यावर दाखवले व कावळे त्या अँटीनावर बसले आहेत हे दाखवले. मी तिला उत्सुकतेपोटी (व कला शिक्षक नसल्यामुळे ) ''मला सूर्य तर दिसत नाही .. '' असं म्हणायचा अवकाश ... ती (बाह्या सरसावूनच!) मला म्हणाली अँटीनावर कावळे काय रात्री बसतात. ज्या अर्थी कावळे आहेत त्या अर्थी सूर्य उगवला असं मानायचं. कारण इमारतीतून डोंगर दिसतच नाहीत इमारतीच दिसतात ना.!!

**- मोहन पाठक, ठाणे**

●●●

दि
शा
नियमित
वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# परिसर वार्ता

## सौ. आनंदीबाई जोशी प्राथमिक विभाग

- २०१२ मध्ये घेण्यात आलेल्या नॅशनल लेव्हल सायन्स टॅलेन्ट सर्च परीक्षेत कु. अदिती अमित पेंडसे ही राष्ट्रीय स्तरावर १९५४ क्रमांकावर उत्तीर्ण झाली असून तिला सुवर्णपदक मिळाले.

- नॅशनल सोसायटी ऑफ फ्रेण्डस् ऑफ ट्रिज तर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळाले –

| | | |
|---|---|---|
| कुमार वरुण गोडबोले | – | प्रथम क्रमांक |
| कुमारी द्रिष्टी सावला | – | द्वितीय क्रमांक |
| कुमारी प्रीती खामकर | – | तृतीय क्रमांक |

- आय. जी. के. ए. तर्फे घेण्यात आलेल्या कराटे स्पर्धेतील काटा प्रकारात कुमार ऋषिकेश निखीलेश सोमण ह्याने कांस्यपदक पटकावले.

## बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक समारंभ दि. १८ जानेवारी रोजी संपन्न झाला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मिलिंद वैद्य, मज्जाशल्यचिकित्सक, फोर्टीस रुग्णालय हे उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी यावेळी महाविद्यालयाच्या अहवालाचे वाचन केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग आणि क्रीडा विभाग यांचा वर्षभर झालेल्या कार्यक्रमांचा अहवाल त्यांच्या विद्यार्थी प्रतिनिधींनी सादर केला.

विज्ञान महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिक संयुजाचे प्रकाशन यावेळी झाले. या वर्षाचे वैशिष्ट्य म्हणजे आधुनिकीकरणाचे एक पाउल पुढे तसेच पर्यावरणाचे संरक्षण या दृष्टीने संयुजाचा अंक e-magazine च्या रूपात महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वेगवेगळ्या क्षेत्रांत आपली चमक दाखवलेल्या विद्यार्थी व शिक्षकांना यावेळी गौरवण्यात आले.

**वार्षिक क्रीडा विभाग पारितोषिक वितरण समारंभ :**

महाविद्यालयात क्रीडा विभाग पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम दि. १९ जानेवारी रोजी डॉ. अनुराधा किशोर रानडे, इतिहास विभाग प्रमुख, पेंढरकर महाविद्यालय, डोंबिवली यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यांनी या क्षेत्रातील त्यांच्या आपली आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत Power Lifting या क्षेत्रातील प्रवास कसा झाला हे सांगितले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी यावेळी डॉ. अनुराधा रानडे यांचे आजवर ३५ संशोधनपर लेख व १३ पुस्तके प्रकाशित झाल्याचे विशेष कौतुक केले.

**साहित्य सहवास :**

दि. २१ जानेवारी रोजी साहित्य सहवास तर्फे कविता वाचन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यासाठी महाराष्ट्र राज्य सरकार पुरस्कार विजेते कवी श्री. तुकाराम धांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

त्यांनी यावेळी आदिवासी बोली भाषेवर आधारित कविता सादर करून निसर्गातील पाच तत्वांचे सत्य उलगडून दाखवले ग्रामीण जीवन व अन्न आणि पाण्यावरील अडचणींवर रचलेल्या कविता सादर केल्या. तसेच यावेळी काही विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांनी देखील आपले काव्य सादर केले. या कार्यक्रमाला १४० विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अनिल आठवले यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. बिपीन धुमाळे यांनी केले.

**भौतिकशास्त्र प्रयोगशाळा उद्‌घाटन :**

दिनांक २१ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयातील नूतनीकरण केलेल्या भौतिकशास्त्र प्रयोगशाळेचा सोहळा पार पडला. यावेळी डॉ. अरुण नरसाळे संचालक (WRIC), मुंबई विद्यापीठ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विभागप्रमुख डॉ. मनोहर न्यायते यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. डॉ. अरुण नरसाळे यांनी अशा उच्च दर्जाच्या प्रयोगशाळेचा लाभ सर्व विद्यार्थी घेतील, असा विश्वास व्यक्त केला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी महाविद्यालयात संशोधनाकरिता उपलब्ध असलेल्या संधींची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. उज्ज्वला गोखे यांनी केले व प्रा. श्री. डी. आर. चौधरी यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

**मराठी दिन :**

दि. २७ फेब्रुवारी रोजी मराठी दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयातील ग्रंथालयात मराठी पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात कुसुमाग्रजांची पुस्तके, मराठी विश्वकोश, भारतीय संस्कृती कोश इत्यादी विविध पुस्तके ठेवण्यात आली होती. या प्रदर्शनाला ७२ विद्यार्थी व ६ शिक्षकांनी भेट दिली.

**विज्ञान दिन :**

दि. २८ फेब्रुवारी रोजी ग्रंथालयात विविध विज्ञान विषयक पुस्तकांचे प्रदर्शन करून 'राष्ट्रीय विज्ञान दिवस' साजरा करण्यात आला. या प्रदर्शनात विविध विज्ञानविषक ज्ञानकोश, विविध विज्ञानपर लेख प्रदर्शित करण्यात आले होते.

२०१२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय गणित वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे या निमित्ताने श्रीनिवास रामानुजन यांच्या बद्दलची माहिती प्रदर्शित करण्यात आली. या प्रदर्शनाला ९५ विद्यार्थी व ८ शिक्षकांनी भेट दिली.

**नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम :**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास चार नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानी मुंबई विद्यापीठातर्फे प्राप्त झाली. अभ्यासक्रमाची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१. जैवविविधता (Certificate Course in Biodiversity)

२. संगणक ॲप्लीकेशन्स (Certificate Course in Computer Applications)

३. बायोइन्फॉरमेटीक्स (Certificate Course in Bioinformatics)

४. अप्लाईड जैवतंत्रज्ञान (Certificate Course in Applied Biotechnology)

**सेवानिवृत्ती :**

श्री. नारायण पाटील, कार्यालय परिचर दि. ३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त झाले. तसेच श्री. आर.एस. सावंत, प्रयोगशाळा परिचर, वनस्पतिशास्त्र विभाग हे दि. २९ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाले.

**विशेष नैपुण्य**

कु. अमित तिवारी हा विद्यार्थी संख्याशास्त्र या विषयात मुंबई विद्यापीठात प्रथम व सर्व विज्ञान शाखेमध्ये विद्यापीठात दुसरा आला. कु. कांचन जोशी ही विद्यार्थिनी मुंबई विद्यापीठात सर्व विज्ञान शाखा मध्ये नवव्या क्रमांकावर आली. कु. प्रियांका वर्मा ही विद्यार्थिनी मुंबई विद्यापीठात वनस्पतिशास्त्र या विषयात द्वितीय क्रमांकावर आली.

●●●

# जीवनपट

## कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर

### १७ मार्च रोजी कुसुमाग्रजांची पुण्यतिथी आहे त्या निमित्ताने

### २७ फेब्रुवारी १९१२ पुणे येथे जन्म

| | | |
|---|---|---|
| | : | नाव – गजानन रंगनाथ शिरवाडकर दत्तक विधान व नामांतर विष्णू वामन शिरवाडकर |
| १९१९–२४ | : | प्राथमिक शिक्षण – पिंपळगांव बसवंत |
| १९२४–२९ | : | माध्यमिक शिक्षण – न्यू. इंलिश स्कूल (आताचे जु. स. रुंगठा हायस्कूल, नाशिक) |
| १९२९ | : | बालबोधमेवा (संपादक :– दे. ना. टिळक) मध्ये लेखन व कविता. मॅट्रिक्युलेशन उत्तीर्ण, मुंबई विद्यापीठ |
| १९३३ | : | हं. प्रा. ठा. महाविद्यालयात प्रवेश व रत्नाकर मासिकात कवितांना प्रसिद्धी |
| १९३२ | : | काळाराम मंदिर – प्रवेश सत्याग्रहात सहभाग |
| १९३३ | : | ध्रुव मंडळाची स्थापना, नव्या मनुमध्ये वृत्तपत्रीय लेख, जीवनलहरी या पहिल्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन |
| १९३४ | : | बी. ए. परीक्षा उत्तीर्ण (मराठी – इंग्रजी) |
| १९३६–३८ | : | गोदावरी सिनेटोनमध्ये प्रवेश. सती सुलोचना कथालेखन व लक्ष्मणाची भूमिका |
| १९३८–४६ | : | वृत्तपत्र व्यवसायात लेखन, साप्ताहिक प्रभात, दैनिक प्रभात, सारथी, धनुर्धारी, नवयुग इत्यादि. विशाखा काव्यसंग्रह (१९४२) |
| १९४४ | : | विवाह. पत्नीचे नाव मनोरमा (माहेरचे नाव – गंगुबाई सोनवणे) |
| १९४६ | : | वैष्णव – पहिली कादंबरी, दूरचे दिवे – पहिले नाटक |
| १९४६–४८ | : | साप्ताहिक स्वदेश संपादन |
| १९५० | : | लोकहितवादी मंडळ स्थापना, संस्थापक सदस्य, शालेय पुस्तकांचे संपादन |
| १९५६ | : | अध्यक्षपद, मुंबई उपनगर साहित्य संमेलन, (मालाड) |
| १९५९ | : | संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सत्याग्रह |
| १९६० | : | मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय ६२ व्या वार्षिक उत्सवाचे अध्यक्षपद |
| १९६० | : | मराठी माती (काव्यसंग्रह) ला राज्य पुरस्कार |
| १९६२ | : | स्वगत (काव्यसंग्रह) ला राज्य पुरस्कार |

१९६२-७२ : सार्वजनिक वाचनालय, नाशिकचे अध्यक्ष

१९६४ : हिमरेषा (काव्यसंग्रह) ला पुरस्कार

१९६४ : मडगांव (गोवा) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अधिवेशन ४५ चे अध्यक्षपद

१९६४-६७ : पुणे विद्यापीठ विधी मंडळावर सदस्य

१९६४ : नाशिक नगरपालिका शतसांवत्सरिक ग्रंथ 'जीवनगंगा' चे प्रकाशन

१९६६ : ययाति आणि देवयानी या नाटकास राज्य पुरस्कार

१९६७ : 'वीज म्हणाली धरतीला' नाटकास राज्य पुस्कार

१९७० : मराठी नाट्य संमेलन, कोल्हापूरचे अध्यक्षपद

१९७१ : 'नटसम्राट' नाटकास राज्य पुरस्कार

१९७२ : सौ. मनोरमाबाईचे निधन

१९८४ : नटसम्राट नाटकास साहित्य अकादमी पुरस्कार(ताम्रपट व पाच हजार रूपये)

१९८५ : अखिल भारतीय नाट्यपरिषदेचा राम गणेश गडकरी पुरस्कार

१९८६ : पुणे विद्यापीठाकडून डी. लिट, पदवीने सन्मानित,

१९८७ : अमृत महोत्सव

१९८८ : संगीत नाट्यलेखन अकादमी पुरस्कार

१९८८ : ज्ञानपीठ पुरस्कार

१९८९ : अध्यक्ष, जागतिक मराठी परिषद, मुंबई : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडून डी. लिट पदवीने सन्मानीत

१९८९ : 'स्वातंत्रदेवाची विनवणी' कविता सर्व शासकीय कार्यालयात भितीपक्षकाच्या स्वरूपात प्रदर्शित

१९९१ : पहिला 'जनस्थान' पुरस्कार वितरीत.

१९९२ : पहिला पाच 'गोदावरी गौरव' वितरीत.

१० मार्च १९९९ : नाशिक येथे निधन व शासकीय इतमामात यशवंतराव महाराज पटांगणावर अंत्यसंस्कार.

कुसुमाग्रजांच्या पुण्यतिथि निमित्ताने

## ।। पाणी म्हणजे जीवन ।।

थेंब थेंब साठवावा । थेंब थेंब तलाव भरावा ।
तलावातील गाळ उपसावा। जल साठ्यासाठी ।।१ ।।

लोकहो पाणी आडवा । लोकहो पाणी साठवा ।
लोकहो दुष्काळ हटवा । पाणी जमिनीत जिरवा ।।२ ।।

आवारात तलाव बांधावे । तलावात पाणी सोडावे ।
पावसाचे पाणी साठवावे । शहरी इमारतीत ।।३ ।।

विहिरीत कचरा टाकू नये । पाणी दूषित करू नये ।
जलस्त्रोत सुकू नये । ठेवावे हेच उदिष्ट ।।४ ।।

जलसंपदा वाचवा । विहिरीचा वापर करावा ।
नित्य उपसा असावा । जलशुधीसाठी ।।५ ।।

जर पाण्याचा झरा आटला । तर जीवनप्रवास संपला ।
विचार हा जयांस पटला । तोच खरा माणूस ।।६ ।।

पाणी जपून वापरावे । तेच लोकांस सांगावे ।
पाणी सर्वांस मिळावे । हाच असावा हेतू ।।७ ।।

बदा बदा पाणी आतू नये । अपव्यय पाण्याचा करू नये ।
थेंबही वाया दवडू नये । पाणी म्हणजे जीवन ।।८ ।।

पाण्याने तहान भागते । पाण्याने अन्न पिकते ।
अन्नाने भूक शमते । सर्व सजीवांची ।।९ ।।

झाडांसाठी रोप लावता । रोपावर पाणी शिंपडता ।
रोपाचा मोठा वृक्ष होता । सावली मिळेल पांथस्था ।।१० ।।

पेराल जेव्हा बीज अनेकदा । वाढेल तेव्हा वृक्ष संपदा ।
वाढेल मग जलसंपदा । तसाच मिळेल प्राणवायू ।।११ ।।

पाणी साठवावे आपण । करावे जलसंधारण ।
करावे वृक्षारोपण । गुंतवणूक भविष्याची ।।१२ ।।

प्रेषक,
**सुरेश रघुनाथ पित्रे**
भ्रमणध्वनी ९००४२३०४०९

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केल आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला २४० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्याचे मंडळाने ठरविले आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

## झाडे लावा

**एका दिवसात सामान्यत: माणूस तीन सिलिंडर भरतील इतक्या प्राण वायूचे (Oxygen) श्वसन करतो.**

**एका Oxygen सिलिंडरची सरासरी किंमत रु ७००/– आहे. म्हणजे एका दिवसाला एक माणूस रु. २१००/– चा प्राणवायू वापरतो. सबंध वर्षाचा हिशोब करता ही किंमत रु. ७,६६,५०० इतकी येते. सरासरी आयुष्य जर ६५ वर्षे धरले तर हीच किंमत साधारणपणे रु. ५ कोटी इतकी येते. हा प्राणवायू आपल्याला आपल्या आजूबाजूला असलेल्या झाडांपासून जवळ जवळ फुकट मिळत असतो आणि आपण झाडांची कत्तल करीत सुटलो आहोत.**

**झाडे लावा!!! झाडे वाचवा!!! झाडे जगवा!!!**

**(मुंबई ग्राहक पंचायत यांच्या सौजन्याने)**

## पसायदान



आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे । तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ।। १ ।।

जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।।२ ।।

दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव । बोलते ते अर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं ।भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७ ।।

आणि ग्रंथोपजीविंये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी ।। ८ ।।

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखया जाला ।। ९ ।।

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❈ *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
❈ *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
❈ *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*
*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❈ संपर्क ❈

कार्यवाह
**विद्या प्रसारक मंडळ**
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्‌, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.